विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष चौथे । अंक सहावा । जून २०२५



## जयंततारा अनंतात विलीन

# महा.अंनिसचे विविध उपक्रम



'ऐसे कैसे झाले भोंदू' विनोदी बतावणी सादर (कोल्हापूर) संघसेन, कपिल, स्वाती, प्रमोद, निशांत व साथी




राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन (गडचिरोली) विठ्ठलराव कोठारे, विलास पारखी व साथी



नुतन शाखा गठित (गोंदिया) रामलाल लांजेवार, युवराज खोब्रागडे, विष्णूदास लोणारे व साथी



जादूटोणाविरोधी कायदा, सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा चित्रमय पुस्तिकांचे वाटप, निमगुळ (धुळे)



बुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रबोधन कार्यक्रम (पालघर) अनिल, मिनेश व साथी



राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन, कोराडी (नागपूर) गौरव आळणे, विलास भालेराव व साथी



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर (कोल्हापूर) कृष्णात, प्रमोद, अमृता, निशांत, राहूल, हर्षल, संघसेन व साथी




सत्यशोधकी विवाह (वर्धा) गजेंद्र सुरकार व साथी

विज्ञान निर्भयता नीती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

आम्ही वारस विवेकाचे

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**

**वर्ष चौथे । अंक सहावा । जून २०२५**

## अनुक्रमणिका


**संपादकीय** ४

**अभिवादन**

- डॉ. जयंत नारळीकर :
  विज्ञान समाजाभिमुख करणारे वैज्ञानिक / डॉ. नितीन शिंदे ५

**प्रासंगिक**

- पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि काही नोंदी/ कॉ. संपत देसाई ८
- मुलींचे संपत्तीविषयक अधिकार आणि सामाजिक मानसिकता / यशवंती शिंदे ११
- भावना दुखावण्याचा आजार / जगदीश काबरे १४

**संघटन**

- हम साथ साथ है.../ विनायक सावळे १७

**विज्ञान विश्व**

- डॉ. शंकर आबाजी भिसे: अफाट शास्त्रज्ञ / डॉ. नितीन हांडे २०

**युवा विश्व**

- विचारधारा आणि तरुणांची दिशाभूल / रेश्मा आरोटे २३

**जडणघडण**

- संघर्षातून विवेकाची वाटचाल / विनया सुशिला २५

**पुस्तक परिचय**

- दास्तान / प्रा. शाम जोगळेकर २७

**कविता**

- भंगार गोळा करणारी म्हातारी.../ प्रा. एकनाथ पाटील २९

**वृत्तांत**

- सोच / पुजा पुहाल ३०

**खबरबात**

- महा. अंनिसची खबरबात/ अनिल शोभना वसंत ३५



## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे


- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
  ‘कल्पतरू’, कर्मवीर भाऊराव
  पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in


- **अंक वितरण**
  आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले / कोल्हापूर
- **स्वागतमूल्य : ₹ २०/-**
- **पृष्ठ संख्या : ४०**

**वार्षिक वर्गणी**

४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)

**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**

**विवेक जागर संस्था**
ICICI **बँक, धुळे**
**खाते नंबर :** 646301002757
IFSC Code : ICIC0006463

Scan & Pay

‘अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका’ हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

# धार्मिक विद्वेष विवेकी प्रेमाने संपवू या...

विचारस्वातंत्र्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हा मानवी समाजाच्या आणि व्यक्तीच्या समन्यायी विकासाचा पाया मानत सतत नवनवीन शोधांसाठी धडपडणारे, अंधश्रद्धामूलक फलज्योतिषाला आव्हान देत महाराष्ट्र अंनिसचे कार्य जोरकसपणे पुढे घेऊन जाणारे लढवय्ये कार्यकर्ते, खगोलशास्त्रज्ञ आणि थोर विज्ञानवादी लेखक डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचे नुकतेच २० मे रोजी निधन झाले. त्यांना या प्रसंगी मी, अंनिस व अंनिपच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

डॉ. नारळीकरांनी आपल्या खगोल संशोधनातून विज्ञानक्षेत्रात उत्तुंग कार्य केले आहे. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी महा.अंनिसला मोठा भाऊ, मार्गदर्शक म्हणून सोबत केली आहे. फलज्योतिष थोतांड आहे, हे सिद्ध करत वैज्ञानिक जाणिवा लोकांमध्ये रुजवण्यासाठी त्यांनी आपले कर्म, वाणी आणि लेखनी झिजवली आहे. त्यांच्या जाण्याने विवेकवादी चळवळीमध्ये एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. परंतु त्यांचे खगोल संशोधनातील कार्य, विवेकवादी वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे साहित्य आज आणि येणारी अनेक दशके आपणाला मार्गदर्शन करत राहाणार आहे.

वर्तमान परिस्थिती धार्मिक विद्वेषाने झाकोळलेली आहे. शेजारी राष्ट्रासोबतच्या युद्धजन्य स्थितीत देशांतर्गत धार्मिक सलोखा, बंधुभाव टिकवण्याचे आव्हान एकीकडे देशापुढे उभे ठाकले आहे, तर दुसरीकडे फोफावत जाणारा दहशतवाद आणि बलाढ्य राष्ट्रांच्या वर्चस्ववादी भूमिकेतून निर्माण होणाऱ्या तणावाला सामोरे जाण्याचे आव्हान पेलावे लागते आहे. अशा परिस्थितीत समाजाला डोळस व धर्मनिरपेक्ष विवेकवादाकडे घेऊन जाणे कधी नव्हे इतके महत्त्वाचे होऊन बसले आहे. अशातच डॉ. नारळीकरांचे जाणे अधिक चटका लावून जाणारे आणि सामाजिक प्रबोधनाच्या जबाबदारीची जाणीव गडद करून देणारे आहे.

दहशतवादाविरुद्धची लढाई चालू ठेवतानाच देशातील धार्मिक सलोखा टिकून ठेवणे आणि त्यासाठी कट्टरतावादी मानसिकतेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी शासन आणि समाज या दोघांवरही आहे. आपणाला महाराष्ट्र अंनिस म्हणून ही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. याचाच एक भाग म्हणून या अंकात पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर याविषयी चिकित्सक आणि सत्याधारित विश्लेषण करणारा लेख छापतो आहोत. शिवाय इतरही काही महत्त्वाच्या विषयावरचे लेख देत आहोत.

या साऱ्यातून विवेकनिष्ठ समाजबांधणीसाठी हातभार लागावा, हीच या अंकाची निष्पत्ती असणार आहे आणि धार्मिक विद्वेष विवेकी प्रेमाने संपवत हेच काम नेटाने पुढे घेवून जाणे हीच डॉ. नारळीकरांसारख्या मानवतावादी शास्त्रज्ञाला खरी आदरांजली ठरणार आहे.

**डॉ. बाळू दुगडूमवार**
अतिथी संपादक


महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# डॉ. जयंत नारळीकर : विज्ञान समाजाभिमुख करणारे वैज्ञानिक

**डॉ. नितीन शिंदे** । इस्लामपूर (सांगली)
मो.९८६०४३८२०८

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि महाराष्ट्राला अभिमान वाटावं असं एक व्यक्तिमत्त्व डॉ. जयंत नारळीकर यांच्या रूपाने दि. २० मे, २०२५ रोजी काळाच्या पडद्याआड गेलं आणि तमाम विज्ञानप्रेमींच्या काळजाचा ठोका चुकला. १९ जुलै, १९३८ रोजी कोल्हापूर येथे जन्म झालेल्या डॉ. जयंत नारळीकर यांनी पुणे येथे शेवटचा श्वास घेईपर्यंत आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण संशोधन आणि विज्ञान प्रसारासाठी समर्पित केलेला आहे. या व्यक्तिमत्त्वाने स्वत: आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन तर केलेच; पण सर्वसामान्य विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना खगोलविज्ञान आणि खगोलभौतिकी विषयात संशोधनासाठी चालना मिळावी यासाठी १९८८ मध्ये डॉ. अजित केंभावी, डॉ. नरेश दधिच आदींच्या सहकार्याने आयुका (IUCAA: Inter University Center for Astronomy and Astrophysics) संस्थेची पुणे येथे उभारणी केली. संशोधनासाठी एखादा माणूस कसा झोकून देऊन काम करतो आणि इतरांनादेखील कसा प्रवृत्त करू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून डॉ. जयंत नारळीकर यांच्या कारकिर्दीकडे पाहावे लागेल. बनारस हिंदू विश्वविद्यापीठातून १९५७ मध्ये बी.एस्सी. पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी इंग्लंड येथील केंब्रिज विद्यापीठातून ज्येष्ठशास्त्रज्ञ फ्रेड हॉयल यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवी संपादन केली. विश्वविख्यात खगोलशास्त्रज्ञ फ्रेड हॉएल यांनी स्थापन केलेल्या Institute of Theoretical Astronomy मध्ये त्यांनी १९९२ पर्यंत संस्थापक सदस्य म्हणून जबाबदारी सांभाळली. विश्वाची निर्मिती एका महास्फोटातून झालेली आहे, या सिद्धांताला छेद देणाऱ्या स्थिर विश्वनिर्मिती सिद्धांताचे १९९३ मध्ये फ्रेड हॉएल, जेफरी बर्बिज आणि डॉ. नारळीकर यांनी पुनरूज्जीवन केले आणि 'स्थिरवत स्थितीचे विश्व' (Quasi Steady State Cosmology) या नावे नवीन सिद्धांत रूढ केला. आयुकाच्या स्थापनेपासून जवळपास पंधरा वर्षे त्यांनी या संस्थेच्या संचालक पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळलेली आहे. सैद्धांतिक भौतिकशास्त्र, खगोल भौतिकशास्त्र तसेच विश्वरचनाशास्त्र हे डॉ. नारळीकरांचे संशोधनाचे विषय होते.



मूलभूत संशोधनाबरोबरच विज्ञान लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या कार्यातही त्यांचा मोठा वाटा राहिलेला आहे. वैज्ञानिक हा विज्ञान लेखक म्हणून यशस्वी होईलच याची शाश्वती नसते. कारण लेखन ही एक वेगळी शैली आहे. त्यातही विज्ञान लेखक म्हणून लेखन करणे आणि ते सोप्या भाषेत सर्वसामान्यांना पटेल अशा स्वरूपात लिहिणे ही कमालीची अशक्यप्राय गोष्ट आहे. परंतु डॉ. जयंत नारळीकर यांनी लेखकाच्या भूमिकेतून लिहिलेली सर्वच पुस्तके प्रचंड लोकप्रिय झालेली आहेत. साहित्याच्या माध्यमातून विज्ञान सोप्या भाषेत कथन करणारे ते एक वेगळं व्यक्तिमत्त्व होतं. 'अंतराळातील भस्मासूर', 'टाईम मशीनची किमया', 'आकाशाशी जडले नाते', 'व्हायरस', 'चार नगरातले माझे विश्व', 'याला जीवन ऐसे नाव', 'गणितातल्या गमतीजमती', 'अंतराळ आणि विज्ञान', 'मी शास्त्रज्ञ कसा झालो' आदी पुस्तके त्यांच्या लेखनशैलीची जाणीव करून देतात. विज्ञान आणि गणित या विषयाशी संबंधित पुस्तके होतीच; पण विज्ञान कथा आणि कादंबऱ्या या देखील त्यांनी स्वत:च्या साहित्याशी जोडून घेतल्या. सर्वसामान्यांना ज्या भाषेतील प्रकारात समजू शकेल त्या

सर्व प्रकारांच्या माध्यमातून त्यांनी विज्ञान लेखन केलेलं आहे. 'आकाशाशी जडले नाते' या पुस्तकाने तर अनेकांना अंतराळाच्या क्षेत्रात संशोधन करायला तसेच छंद म्हणून जोपासायला उद्युक्त केले. एवढेच नाही, तर विज्ञानाकडे पाहाण्याची एक नवी दृष्टी दिली. त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू प्रामुख्याने विद्यार्थी वर्ग होता. कारण त्यांची धारणा अशी होती की, हाच एक असा वर्ग आहे जो चिकित्सक असतो, नावीन्याची आस घेऊन वाटचाल करत असतो आणि मुख्य म्हणजे या वर्गालाच निसर्गात घडणाऱ्या घटनांच्या अनुषंगाने प्रश्न पडत असतात. फक्त त्या प्रश्नांची योग्य उत्तरे त्याला मिळाली नाहीत, तर तो आपली चिकित्सक वृत्ती सोडून देतो. बहुतेक त्यामुळेच या वर्गाला चिकित्सेसोबत जोडून ठेवण्यासाठी त्यांनी शेवटपर्यंत आपली नाळ त्यांच्याशी जोडलेली असावी.

वैज्ञानिक हा लोकप्रिय वक्ता म्हणून यशस्वी होईलच याचीसुद्धा शाश्वती नसते. पण डॉ. जयंत नारळीकर हे या कौशल्यालादेखील अपवाद ठरलेले आहेत. विज्ञान आणि वैज्ञानिक संकल्पना अत्यंत सोप्या आणि विनम्र भाषेत सांगत सर्वसामान्यांच्या मनात विज्ञानाबद्दल आवड निर्माण करणारं त्याचं लाघवी वक्तृत्व आणि तरुणाईला संशोधनासाठी प्रवृत्त करणाऱ्या त्यांच्या वैज्ञानिक संकल्पनाचे सादरीकरण हा एक प्रकारचा अमूल्य ठेवाच म्हणावा लागेल. मुख्य म्हणजे शालेय मुलांच्यामध्ये रममाण होणारे, मुलांच्या प्रश्नांना शांतपणे उत्तर देणारे डॉ. जयंत नारळीकर हे अफलातून व्यक्तिमत्त्व म्हणावं लागेल. शालेय विद्यार्थी हा त्यांचा बहुतेक weak point असावा. याचं कारण बहुतेक लंडनमध्ये असताना त्यांच्या मुलीच्या बाबतीत घडलेला एक प्रसंग असावा असा माझा कयास आहे. इंग्लंड येथील वास्तव्यादरम्यान त्यांच्या मुलीच्या शाळेत घडलेला किस्सा ते नेहमी सांगत असत. शिक्षणपद्धती काय असावी याचा तो एक उत्तम नमुना होता. एक दिवस ते आपल्या मुलीच्या अभ्यासातील प्रगती संदर्भात विचारपूस करण्यासाठी मुलीच्या शाळेत गेले होते. तेथील शिक्षकांना त्यांनी मुलीच्या अभ्यासातील प्रगतीबद्दल विचारपूस केली. तेव्हा शिक्षकांचे उत्तर ऐकून डॉ. नारळीकर आश्चर्यचकित झाले. शाळेतील शिक्षक डॉ. नारळीकरांना म्हणाले की, ''तुमची मुलगी अत्यंत हुशार आहे, यात बिलकुल शंकाच नाही; पण ती आम्हाला कधी प्रश्नच विचारत नाही.'' या उत्तराने डॉ. नारळीकर आश्चर्यचकित झाले असणार. कारण आपल्याकडे शिक्षक मुलांना प्रश्न विचारतात. पाश्चात्त्य देशात मुले शिक्षकांना प्रश्न विचारतात. कारण प्रश्न मुलांना पडतात. त्यामुळे शिक्षकांनी उत्तर देणं अपेक्षित आहे. समजा, मुलांनी प्रश्न विचारल्यावर उत्तर देता आलं नाही, तर डॉ. नारळीकर म्हणतात की, यात शिक्षकांनी कमीपणा मानण्याचे कारण नाही. काहीवेळा उत्तर माहीत असेलच असं नाही; पण शिक्षकांनी त्यावेळेस मी नंतर तुला उत्तर सांगेल असं नम्रपणे सांगणे गरजेचे आहे. आपल्याकडील शिक्षण पद्धतीत शिक्षक मुलांना प्रश्न विचारतात, हा विरोधाभास त्यांना यानिमित्ताने बहुतेक अधोरेखित करायचा असावा.

विज्ञान आणि समाजाचे प्रश्न या दोहोंची त्यांनी अत्यंत चपखलपणे सांधेजोड केलेली आपल्याला दिसून येते. हे दोन्ही विषय अलिप्त राहूच शकत नाहीत हे त्यांच्या वक्तृत्वातून आणि लिखाणातून वेळोवेळी दिसून येते. खगोलविज्ञानाच्या नेमकी विरुद्ध भूमिका घेऊन वाटचाल करणाऱ्या 'फलज्योतिष' या वादाच्या विषयावर त्यांनी वेळोवेळी परखड मांडणी करून सुद्धा ते स्वत: कधीही वादाचा विषय झाले नाहीत. सन २००१ मध्ये युजीसीच्या माध्यमातून ज्योतिष अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी घेतलेला होता. परंतु डॉ. जयंत नारळीकर, प्रो. यशपाल आणि इतर अनेक वैज्ञानिकांनी त्यावेळी विरोध केल्याने सदर प्रस्ताव रद्द करावा लागला होता. ही जरब होती वैज्ञानिकांची. पण...

'एकविसाव्या शतकातील विज्ञान व तंत्रज्ञानाची प्रगती विचारात घेतल्यावर आजही जेव्हा मला एखादा शिकलेला माणूस विचारतो की, ग्रहांचे मानवी जीवनावर परिणाम होतात का? तेव्हा मला आश्चर्य आणि खेद, दोन्ही अनुभवायला मिळतात. आश्चर्य यासाठी की, एकविसाव्या शतकातील मानव हा प्रश्न विचारतोय आणि खेद यासाठी, की विचारणारा भारतीय आहे.' हे त्यांचे वक्तव्य फलज्योतिषविरोधी भूमिका परखडपणे विषद करते. मंगळ तांबडा का दिसतो? शनीला कडी का असतात? गुरूला जास्त उपग्रह का आहेत? असे प्रश्न आमच्या मुलांनी विचारण्याची गरज आहे. अशा प्रकारचे

शिक्षण आपल्या शिक्षणव्यवस्थेने देण्याची गरज आहे, असंच काहीसं त्यांना वरील वक्तव्यातून सांगायचं असावं असं वाटतं.

डॉ. नारळीकर यांचे 'अंनिस'शी घनिष्ठ संबंध होते. डॉ.नरेंद्र दाभोलकर, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि डॉ. जयंत नारळीकर हे समीकरण अफलातून होते. बहुसंख्य वैज्ञानिक वादाच्या, भावनेच्या आणि श्रद्धेच्या क्षेत्रामध्ये होत असलेल्या अवैज्ञानिक बाबींमध्ये हस्तक्षेप करत नाहीत; परंतु डॉ. जयंत नारळीकर त्याला अपवाद होते. याची प्रचिती खगोलविज्ञान प्रसार आणि फलज्योतिषविरोधी त्यांच्या भूमिकेने वारंवार पुढे आलेली आहे. महाराष्ट्र अंनिसच्या अनेक उपक्रमांत त्यांचा सहभाग असायचा. फलज्योतिष हे शास्त्र आहे की नाही, हे विज्ञानाच्या निकषांवर तपासण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, आयुका आणि पुणे विद्यापीठाचा संख्याशास्त्र विभाग यांनी एकत्रितपणे २००८ मध्ये जाहीर चाचणी घेतली होती. मतिमंद शाळेतील शंभर मुले आणि शाळेत सतत पहिले येणारी शंभर मुले यांच्या अचूक जन्मवेळा ज्योतिषांना व त्यांच्या संस्थांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्याद्वारे संबंधित विद्यार्थी मतिमंद आहे की बुद्धिमान आहे, हे सांगणे ज्योतिषांकडून अपेक्षित होते. मात्र सरासरी ५० टक्केसुद्धा उत्तरे बरोबर आली नाहीत. फलज्योतिषांना आव्हान देणारी ही चाचणी घडवून आणण्यात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. नारळीकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले होते.

सन २००९ हे आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र वर्ष म्हणून युनेस्कोने जाहीर केलेले होते. याचे औचित्य साधून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी संघटनेच्या वतीने खगोलयात्रा काढण्याचे सूचित केले होते आणि त्याची संघटना पातळीवर तात्काळ अंमलबजावणी करण्यात आली. दि. १७ ते २६ नोव्हेंबर २००९ अखेर पहिला टप्पा आणि दि. २० ते ३० डिसेंबर २००९ दुसरा टप्पा असे नियोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे या यात्रेला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी डॉ. नारळीकर यांना डॉ. दाभोलकर यांनी येण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी तात्काळ होकार दिला. एवढेच नाही, तर आयुकाच्या परिसरातून या यात्रेची सुरुवात करावी, असे त्यांनी सूचित केले. डॉ. दाभोलकर यांनी हा निरोप आम्हाला सांगितल्यानंतर आम्हाला झालेला आनंद अवर्णनीय होता. दि. १७ नोव्हेंबर २००९ रोजी आम्ही सर्व कार्यकर्ते आयुकाच्या परिसरात गेलो, तिथे विविध पोस्टर लावले. डॉ. नारळीकर यांनी सदर पोस्टर्स प्रदर्शनाचे उद्घाटन केले आणि यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. डॉ. नारळीकरांशी हितगुज करण्याची संधी डॉक्टरांनी आम्हाला उपलब्ध करून दिली. याप्रसंगी केलेल्या मार्गदर्शनामध्ये खगोलविज्ञानाबरोबरच फलज्योतिष याविषयीदेखील भाष्य करा, असा मौलिक सल्ला त्यांनी दिला होता. तसेच दि. २० ऑगस्ट, २०१४ रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या 'डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेक व्याख्यानमाला' मध्ये त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल आपले परखड मत व्यक्त केले होते.

१९६५ मध्ये पद्मभूषण, १९९६ मध्ये युनेस्कोचा कलिंग पुरस्कार, १९९० मध्ये इंदिरा गांधी पुरस्कार, २००४ मध्ये पद्मविभूषण, २०१० मध्ये महाराष्ट्र सरकारचा महाराष्ट्र भूषण, २०१४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार आणि विशेष म्हणजे जानेवारी २०२१ मध्ये नाशिक येथे संपन्न झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील भूषवणाऱ्या या ओजस्वी वैज्ञानिकाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने भावपूर्ण आदरांजली. त्यांनी दिलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या दिशेने कार्यरत राहाणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल.

**(लेखक महा.अंनिसच्या पत्रिकेचे संपादक आहेत.)**

●

**महा. अंनिसच्या वेबसाइटला जरूर भेट द्या. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे मार्च २०२५ पर्यंतचे अंक या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. वेबसाईटची लिंक**
**https://www.mans.org.in**



# पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि काही नोंदी

**कॉ. संपत देसाई ।** आजरा (कोल्हापूर)
मो. ९९७५०९८५१४

इसवी सनपूर्व २५० वर्षांपूर्वी सम्राट अशोकाने राज्यविस्तार व सागरीकिनारा ताब्यात घेण्यासाठी कलिंगवर हल्ला केला. राजा अनंत पद्मनाभसोबत युद्ध पुकारले. कलिंगचे युद्ध सम्राट अशोक जिंकला. पण युद्धात मोठ्या प्रमाणात झालेली जीवितहानी पाहून त्याला जबर मानसिक धक्का बसला. युद्ध जिंकूनही अशोकाला प्रचंड दु:ख आणि पश्चात्ताप झाला. त्याने युद्ध आणि हिंसा यापासून दूर राहाण्याचा निर्णय घेतला. त्याने बौद्ध धम्म स्वीकारला. बौद्ध धम्मातील शांतता, सहिष्णुता आणि अहिंसा या तत्त्वावर राज्यकारभाराचे नवे धोरण बनविले. आपल्या राज्याला समृद्धीच्या शिखरावर आणून सोडले. कलिंगचे युद्ध हे भारतीय इतिहासाला नवी दिशा देणारे ठरले. असा समृद्ध वारसा असलेल्या देशात नुकताच घडलेला पहलगाम हल्ला आणि त्यानंतर घडलेल्या सर्वच घटना या संवेदनशील माणसाला अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत.



२२ एप्रिल, २०२५ रोजी काश्मीर खोऱ्यातील पहलगामच्या बैसरन घाटीत दहशतवादी हल्ला झाला. त्याला आता एक महिना उलटून गेला. पाच सशस्त्र दहशतवाद्यांनी २५ पर्यटक आणि एक स्थानिक नागरिक अशा २६ लोकांना गोळ्या घालून ठार मारले. या हल्ल्याने सारा देश हादरला. देशभरात संतापाची लाट उसळली. २६/११ च्या मुंबई हल्ल्यानंतर देश हादरवणारी ही सर्वात मोठी घटना. मधल्या काळात उरी आणि पुलवामा हे दोन दहशतवादी हल्ले होऊन गेले; पण या हल्ल्याची भीषणता भयानक होती. सारा देश या हल्ल्याने हादरला. सुरुवातीला लष्कर ए तोयबाची एक शाखा असलेल्या रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) या दहशतवादी गटाने या हल्ल्याची जबाबदारी उचलली आणि नंतर मात्र टीआरएफने हल्ल्याची जबाबदारी नाकारली. तिने भारतीय सायबर गुप्तचर यंत्रणेवरच ठपका ठेवला. खरंतर यापूर्वी काश्मीरमध्ये झालेल्या अनेक हल्ल्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे.

यापूर्वी झालेले हल्ले आणि या हल्ल्यात मोठा फरक आहे. दहशतवाद्यांनी ठरवून बिगरमुस्लीम नागरिकांना लक्ष्य केले. हिंदू आणि ख्रिश्चन पर्यटकांवर गोळ्या घालण्यापूर्वी त्यांचा धर्म विचारला. पर्यटकांमध्ये अनेक नवविवाहित जोडपी होती. त्यांच्या पत्नीसमोरच पुरुषांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले. त्यातही स्त्रियांना बाजूला काढून पुरुषांच्यावर गोळ्या घातल्या गेल्या. या निर्दयी हल्ल्याचे भारतात नव्हे तर जगभरात पडसाद उमटले. अमेरिकेसह आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक देशांनी या घटनेचा निषेध केला. पाकिस्ताननेही या हल्ल्याचा निषेध करून आमचा या हल्ल्याशी काही संबंध नाही, हे दर्शवण्याचा प्रयत्न केला. पण पाकपुरस्कृत दहशतवादी संघटना या हल्ल्यामागे आहे, अशी ठाम भूमिका भारताने घेतली. सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी दौरा अर्ध्यावर सोडून भारतात परतले.

कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी (CCS) ची बैठक बोलावली. या बैठकीनंतर भारतीय परराष्ट्रसचिव विक्रम मिस्त्री यांनी जगभरातल्या वरिष्ठ राजदुतांना भारत सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. सिंधू जलकरार तात्काळ स्थगित करणे, दोन्ही देशातील मुख्य सीमा ओलांडण्याला बंदी, सार्क व्हिसा सुत अंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवास बंदी, नवी

दिल्लीतील पाकिस्तानी राजदुतांना हद्दपार आणि इस्लामबादमधील भारतीय राजदुतांना मागे घेत असल्याचे निर्णय घोषित केले. याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने भारताचे सगळे आरोप फेटाळत सिमला करार स्थगित केला. व्यापार आणि हवाई क्षेत्र भारतासाठी प्रतिबंधित केले. याचदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी श्रीनगरला आणि ज्या ठिकाणी हल्ला झाला त्या ठिकाणाला भेट दिली. सरकारने सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी मान्य करून २४ एप्रिल रोजी या हल्ल्याबाबत माहिती देण्यासाठी आणि पुढील दिशा ठरवण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावली. या बैठकीला पंतप्रधान मोदी अनुपस्थित राहिले.

याच दिवशी म्हणजे २४ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी या दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या हल्लेखोरांची माहिती देणाऱ्यांना २० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले. हल्ल्यातून वाचलेल्या लोकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे जम्मू-काश्मीर पोलिसांनी त्यांचे रेखाचित्र बनवून त्यांची ओळख उघड केली. त्यातील तीन दहशतवादी हे लष्कर ए तोयबा या संघटनेशी संबंधित आहेत. भारतीय गुप्तचर यंत्रणेने मिळविलेल्या माहितीच्या आधारे भारतीय अधिकाऱ्यांनी पहलगाम हल्ल्याचा संबंध पाकिस्तानशी जोडला आहे. भारतीय सैन्याने काश्मीरमध्ये राहाणाऱ्या संशयित अतिरेक्यांची घरे उद्ध्वस्त केली. २६ एप्रिल रोजी गृहमंत्रालयाच्या दहशतवादविरोधी विभागाच्या आदेशाने नवीन माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवला गेला. शेकडो स्थानिकांना सुरक्षा यंत्रणेने वेढले.

**ऑपरेशन सिंदूर...**

यापूर्वी झालेल्या उरी, पुलवामा दहशतवादी हल्ल्याला भारताने पाकिस्तानला जबाबदार धरून एयर स्ट्राईक घडवून त्याला चोख प्रत्युत्तर पण दिले होते. पहलगामच्या हल्ल्यानंतर केवळ आर्थिक किंवा राजनैतिक कोंडी करून न थांबता 'ऑपरेशन सिंदूर' हाती घेतले. ७ मे, २०२५ रोजी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ ठिकाणांवर हल्ला करून दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. भारताने केलेला हा हल्ला पाकिस्तानी नागरिकांच्यात होता असा कांगावा पाकने केला. या हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिक मारले गेले आहेत म्हणून पाकिस्तानने प्रत्युत्तरादाखल सीमेलगतच्या अनेक भागात ड्रोन आणि क्षेपणास्त्राचे हल्ले केले. यानंतर दोन्ही देशात तणाव वाढला. युद्धसदृश्य परिस्थिती तयार झाली. ७ मे ते १० मे दोन्ही बाजूने ड्रोन आणि क्षेपणास्त्रे वापरली गेली. त्यात दावे-प्रतिदावे केले जाऊ लागले. काही सैनिक तर नागरी वस्त्यांवर झालेल्या हल्ल्यात निष्पाप लोकही बळी पडले. तुर्कस्तान, चीन या देशांनी पाकिस्तानला समर्थन दिल्याने युद्धाचा भडका उडणार हे जवळजवळ निश्चित झाले. पण ''मीच शस्त्रसंधी घडवून आणली.'' अशी दर्पोक्ती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. अर्थात हा दावा आपल्या परराष्ट्र सचिवांनी फेटाळून लावला हेही तितकेच खरे आहे. दोन्ही देशांनी शस्त्रसंधी जाहीर केल्याने युद्धाचे संकट टळले.

**काही महत्त्वाच्या नोंदी**

याप्रमाणे घटनाक्रम घडला असला तरी पहलगाम हल्ल्यामागील दहशतवाद्यांचा हेतू, त्यांनतर भारतात सर्वदूर माध्यमांच्यापासून सर्वसामान्य माणसांच्यापर्यंत उमटलेल्या प्रतिक्रिया याची चर्चा करणे मला महत्त्वाचे वाटते.

हा हल्ला वेगळा कसा? हल्ल्याचा नेमका हेतू कोणता? खरंतर पहलगाम हल्ल्यापूर्वीही भारतात अनेक दहशतवादी हल्ले झाले. पण या हल्ल्याचे वेगळेपण म्हणजे या हल्ल्यात धर्म विचारून गोळ्या घातल्या गेल्या. हल्ला करताना दहशतवाद्यांनी स्त्रियांना बाजूला केले? मुस्लिमेतर पर्यटकांना गोळ्या घालून मारले गेले. यावरून त्यांचा हिंदू-मुस्लीम तेढ वाढवणे आणि धार्मिक दंगली घडवून भारताची अंतर्गत सुरक्षितता धोक्यात आणणे हा या हल्ल्याचा मुख्य हेतू होता. हल्ला झाल्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांच्या आयटी सेलने सोशल मीडियावर मुस्लिमांच्या विरोधात गरळ ओकायला सुरुवात केलेली. या हल्ल्यानंतर देशात इस्लामोफोबिक आणि काश्मीरविरोधी भावनांमध्ये वाढ झाली. विशेषतः काश्मिरी महिला आणि विद्यार्थ्यांना अतिउजव्या हिंदुत्ववादी गटाकडून धमक्या, छळ, मारहाण यांसारख्या घटनांना सामोरे जावे लागले. मुस्लिमांच्यावर बहिष्काराचे सार्वजनिक आवाहन करण्यात आले. हरियाणातील रोहटक जिल्ह्यातील खरावर गावातील मुस्लीम कुटुंबांना सक्तीने गावं सोडण्याचा आदेश दिला. उत्तर भारतात अशा घटना घडत असताना महाराष्ट्रही त्यात मागे नव्हता. भाजपच्या महिला कार्यकर्त्या आणि इतर नऊ जणांवर सोफियान

शहीद अली नावाच्या युवकाला रोहिंग्या मुस्लीम समजून मारहाण केल्याचा गुन्हा शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात नोंदवला गेला आहे. अशा काही घटना घडत असल्या तरी त्याला जनतेचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

ज्या काश्मीरमध्ये हा दहशतवादी हल्ला झाला त्या प्रदेशातील श्रीनगर, पुलवामा, शोफिया, पहलगाम, अनंतनाग, बारामुल्ला यांसह काश्मीरमधील मुस्लीम बहुल प्रदेशांमध्ये या हल्ल्याच्या निषेधार्थ मुस्लीम समाज मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला. हा आमच्या काश्मिरियतवर आघात आहे असे म्हणून त्यांनी शोक आणि संताप व्यक्त केला. श्रीनगरच्या जामिया मशिदीत प्रवचन झाले. मृतांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रार्थना आणि दुवा मागितली गेली.

पहलगाम हल्ल्यात मारल्या गेलेल्या अनेकांच्या नातेवाईकांनी सोशल मीडियावर व्हिडिओ शेयर करून स्थानिक मुस्लिमांनी केलेली मदत पुढे आणली. त्यामुळे मुस्लीमविरोधी वातावरण बनवण्याचा जो प्रयत्न चालवला होता, त्याला खीळ बसली. १ मे, २०२५ रोजी हिमांशी नरवाल हिने एकतेचे आणि सांप्रदायिक सौहार्दाचे आवाहन केले. तिला उजव्या हिंदुत्ववादी शक्तीकडून मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले.

एका बाजूला हिंदू-मुस्लीम द्वेष जाणीवपूर्वक पसरवण्याचा प्रयत्न सुरू असताना भारताच्या विविध भागांत असलेल्या काश्मिरी मुसलमानांना संरक्षण, राहाण्यासाठी सुरक्षित जागा, अन्न आणि प्रवासाची व्यवस्था शीख स्वयंसेवकांनी करून दहशतवाद्यांना आणि इथल्या जातीयवादी धर्मांध शक्तींचे मनसुबे उधळून लावले.

लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधीनी सरकारला पाठिंबा देत असतानाच काश्मीरबाबतच्या भारत सरकारच्या धोरणावरही टीका केली. एमआयएमचे अध्यक्ष असउद्दिन ओवेसी यांनी दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचा आरोप करून पाकिस्तानवर टीका केली.

७ मे ला ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यानंतर काही इलेक्ट्रॉनिक मीडियाने कहरच केला. तो भलताच चेकाळला होता. युद्ध म्हणजे जणू रामानंद सागरची 'रामायण' आणि चोप्रांच्या 'महाभारत' सिरीयल इतकं युद्धाचं किरकोळीकरण भारतीय मीडियाने करून टाकलेले होते. जणू युद्ध यांच्याच निगराणीखाली सुरू असल्याच्या बातम्या प्रसारित करत युद्धसुद्धा कसे मनोरंजक बनवले जाऊ शकते, हे भारतीय मीडियाने दाखवून दिले. भारत-पाक युद्धाला त्यांनी 'बदले की आग', सूड यांसारख्या हाणामारी करणाऱ्या चित्रपटाच्या लेवलला आणून ठेवले. खोटे व्हिडिओ व्हायरल करून युद्धज्वर वाढवण्याचे काम केले. मुस्लीम विरोधाचे विष पसरवले गेले. ते झिरपत झिरपत पार तळापर्यंत म्हणजे खेड्यापाड्यापर्यंत पोहचले. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील मालवे ग्रामपंचायतीने कोणाही मुस्लिमाला जमीन, घर भाड्याने किंवा विकत देऊ नये असा ठराव केला.

ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यामागे एक सांस्कृतिक राजकारण आहे. दहशतवादी हल्ल्यात जे पुरुष मारले गेले त्यांच्या स्त्रिया विधवा झाल्या. सिंदूर हे पितृसत्तेचे आणि हिंदू स्त्रियांच्या गुलामीचे प्रतीक आहे. युद्धात, दंगलीत नेहमीच शत्रुपक्षांच्या बाईचे शरीर रणभूमी म्हणून वापरले जाते. बाईच्या गुलामीच्या बळकटीकरण म्हणजे सिंदूर या प्रतीकाचे गौरवीकरण होय. दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याच्या निमित्ताने भारतीय पितृसत्ताक मानसिकता अधिक घट्ट करणे होय.

देश युद्धजन्य परिस्थितीत असताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र सर्वपक्षीय बैठकीला अनुपस्थित राहिले. परदेश दौरा अर्ध्यावर सोडून आलेले मोदी थेट बिहारच्या निवडणूक प्रचारात सहभागी झाले.

यातील शेवटची महत्त्वाची नोंद म्हणजे पहलगामचे नलीन प्रभात हे डेप्युटी जनरल ऑफ पोलीस होते. त्यांची कारकीर्द कायम संशयास्पद राहिली आहे. पुलवामा, बिजापूर नक्षलवादी हल्ला, छत्तीसगड दंतेवाडा हल्ला अशा अनेक हल्ल्यांच्यावेळी त्यांचा नाकर्तेपण सिद्ध झाले आहे. दंतेवाडा प्रकरणात तर नक्षली हल्ल्यात ७६ जवान मारले गेले. त्यावेळी त्यांना दोषी ठरवून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई झाली होती. असे असताना अशा संवेदनशील ठिकाणी इतकी मोठी जबाबदारी त्यांना दिलीच कशी?

एकंदरीत पाहता, पहलगामच्या हल्ल्यानंतर भारतात धार्मिक तणाव तयार होईल, हिंदू-मुस्लीम दंगे होतील, सर्वत्र अराजकता माजेल आणि भारताची अंतर्गत सुरक्षितता धोक्यात येईल, हा दहशतवाद्यांचा हेतू भारतीय जनतेने उधळून लावला. याचे सर्वात जास्त श्रेय जाते ते

**(पृष्ठ क्रमांक १३ वर)**



# मुलींचे संपत्तीविषयक अधिकार आणि सामाजिक मानसिकता

**यशवंती शिंदे** I कोल्हापूर
मो. ८८३०१७५१५७

काही दिवसांपूर्वी एका वकिलांच्या ऑफिसमध्ये जाण्याचा प्रसंग आला. तिथे ते बऱ्याच केसेसविषयी समजावून सांगत होते. ॲग्रीमेंट, सेल डीड, प्रॉपर्टीचे हस्तांतरण, एन. ए., सातबारा इत्यादी गोष्टी व्यवहारात कशा काम करतात, खरेदी विक्रीच्या कोणत्या टप्प्यावर विकणाऱ्याने कोणती काळजी घेतली पाहिजे, खरेदी करणाऱ्याने काय काळजी घेतली पाहिजे अशी इत्थंभूत माहिती सोप्या भाषेत वकिलांनी समजावून सांगितली.

त्यावेळी त्यांच्याकडे वडिलोपार्जित प्रॉपर्टीची एक केस होती. त्याबद्दल त्यांनी माहिती दिली. केसमध्ये एक बहीण आणि भाऊ होते. त्यामधील भावाने बहिणीच्या लग्नानंतर वेळोवेळी प्रेम आणि आपुलकीच्या भावनेपोटी तिला बरीचशी आर्थिक मदत केली होती, तिच्या संसाराला हातभार लावला होता. बहिणीच्या मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठीही खूप खर्च केला होता. अर्थात हे सगळं नैसर्गिक प्रेमापोटी. बहीणभावाचे नाते अतिशय सुदृढ म्हणावे असे म्हणजे एकाला ठेच लागली तर दुसऱ्याच्या डोळ्यांत पाणी यावे इतके मजबूत होते.

अशातच वडिलांच्या मृत्यूनंतर वडिलोपार्जित शेतीवाडी किंवा काही संपत्ती असेल ती आपल्या नावे करून घ्यायची होती. वडिलांनी मृत्यूपूर्वी आपल्या प्रॉपर्टीची वाटणी केलेली नव्हती. त्यामुळे अर्थातच त्या दोघांचीही वारस म्हणून नावे लागली होती. भावाची स्वाभाविक भावना अशी होती की, आपण आपल्या बहिणीसाठी, तिच्या संसारासाठी खूप मदत केली आहे, त्यामुळे वडिलांची सगळी प्रॉपर्टी आपल्या नावावर करून घेताना बहीण स्वखुशीने, 'ना हरकती'साठीची सही करेल. पण बहीण म्हणाली, ''मला माझा हिस्सा हवा आहे. मी माझ्या हिश्श्याला जे येईल ते घेणार आहे.'' भाऊ यासाठी नाखुशीने का होईना तयार झाला.

व्यावहारिक दृष्टीने विचार केला तर बहिणीला माहेरी येऊन तिच्या वाट्याला येणारी शेती कसणं किंवा वडिलोपार्जित घरात जो हिस्सा मिळणार होता, ते सांभाळणं शक्य नव्हतं. त्यामुळे वकिलांच्या सल्ल्याने या प्रॉपर्टीची ठरावीक रक्कम बहिणीला देऊन त्या बदल्यात ती भावाच्या नावावर करायची अशी सेटलमेंट झाली.

ठरल्या दिवशी बहीणभाऊ कोर्टात आले. तिने सह्या केल्या, त्या बदल्यात वकिलांच्या साक्षीने ठरल्या रकमेचा डीडी भावाने बहिणीला दिला. काम झाल्यावर बहीण म्हणाली, ''दादा, काम झालं. आपण आपल्या घरी जाऊ या.'' यावर भाऊ म्हणाला, ''कुणाचं घर? तुझे तुझ्या हातातल्या डीडीबरोबर माहेरशी नातेही संपले. त्याबरोबर आपला संबंधही संपला. तू आता माहेर किंवा वडिलांचं घर विसरून जा.''

वकिलांनी हा किस्सा सांगितला आणि म्हणाले, ''खरं तर आजच्या जमान्यात बहिणीसाठी कुणी काही करत नाही. बहिणीने प्रॉपर्टी घ्यायला नको होती. तिनं पैशांसाठी कायमचं माहेर गमावलं.''

सामाजिकदृष्ट्या विचार केला तर हे खरंही होतं. पैसा, प्रॉपर्टी, त्यातील हिस्सा अशा गोष्टी नात्यांत आल्या की, नाती संपतात. पण वास्तविक विचार करायला गेलं तर बहिणीचं काय चुकलं? वारसा हक्क कायद्यानुसार स्त्रियांना वडिलोपार्जित संपत्तीमध्ये पुरुषांइतकाच समान अधिकार आहे. तो तिने मागितला आणि घेतला. भावाला हे अनपेक्षित होतं. त्याने बहिणीसाठी हे नैसर्गिक प्रेमापोटी खूप केले. पण त्याच्या बदल्यात तिने तिच्या वाट्याला जे येणार आहे, त्यावरचा हक्क सोडावा अशी त्याची अपेक्षा गैर नाही का?

एकाच वडिलांचे दोन मुलगे वडिलांच्या पश्चात त्यांची संपत्ती वाटून घेतात आणि एकमेकांसोबत आयुष्यभर बांधाला बांध आणि घराच्या भिंतीला भिंत लागून राहातात. काही वेळा त्यांच्यामध्ये भांडणं होतात. परंतु दोघांनी आपले समान वाटे करून घेणे कुणालाही चुकीचे, अव्यवहार्य, क्रूर वाटत नाही किंवा एका भावाने दुसऱ्या भावाकडून वाटा मागितला म्हणून तो चुकीचा ठरत नाही. उलट मुलांना समान वाटणी करून द्यायला समाजातील काही घटक पुढे सरसावतात. मुलीने मात्र

तसा कायदेशीर अधिकार मागितला तर मात्र ती चुकीची, स्वार्थी ठरते हे सामाजिक वास्तव आहे. याची पाळेमुळे आपल्या परंपरागत समाजरचनेतील स्त्रियांच्या स्थानामध्ये आहेत.

स्वातंत्र्यानंतर १९५६ साली वारसा हक्क कायदा पास करण्यात आला. तत्पूर्वी स्त्रियांना संपत्तीविषयक कसलाही अधिकार नव्हता. ती जिवंत आहे तोपर्यंत तिने तिच्यासाठी नेमून दिलेली संपत्ती वापरावी. म्हणजे तिला जगण्याच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी जे काही लागेल ते त्याच्यातून तिने प्राप्त करून घ्यायचे आणि तिच्या मृत्यूनंतर ती संपत्ती आज जशी मिळते तशी तिच्या मुलामुलींना किंवा वारसांना न मिळता, ती ज्या सोर्सकडून तिला मिळाली होती तिथे परत जात होती. म्हणजे नवऱ्याच्या घरातून मिळाली असेल तर ती त्या घरातील पुरुषांकडे किंवा वडिलांकडून मिळाली असेल तर ती परत वडिलांच्या पुरुष वारसांकडे हस्तांतरित होत असे. वारसा हक्क कायद्याने मात्र स्त्रियांना संपत्तीविषयक अधिकार मिळाला. संपत्ती विकत घेण्याचा किंवा वडिलोपार्जित संपत्तीमध्ये पुरुषाच्या बरोबरीने अधिकार मिळाला. म्हणजे खऱ्या अर्थाने ती आपल्या संपत्तीची मालक झाली.

हा कायदा पास होऊनही जवळजवळ पाऊण शतक पूर्ण होत आले आहे; परंतु समाजात किती स्त्रियांना वडिलोपार्जित संपत्तीमध्ये आपला समान वाटा असतो हे माहीत आहे? माहीत असले तरी तो अधिकार किती स्त्रिया मागतात? मागत असल्या तरी स्वेच्छेने कितीजणी मागतात आणि सासरच्या दबावापोटी किती मागतात? तिचा वाटा मिळाल्यानंतर किती स्त्रियांचे त्यांच्या माहेराशी सलोख्याचे संबंध टिकून आहेत? हा एक संशोधनाचा विषय आहे.

स्त्रियांसाठी अनेक कायदे किंवा सुविधा असतात, पण स्त्रिया त्याबद्दल जागरूक नसतात. जागरूक असल्या तरी समाजमान्यता नसते. एखादीने तशातही असे हक्क मागितले, ते मिळाले तर समाजात फार मोठ्या प्रमाणात दूषणे दिली जातात. त्यामुळे आपण आपल्या नातेवाईकांपासून दुरावले जाऊ, आपले माहेराशी संबंध कायमचे संपतील या भीतीपोटी स्त्रियाही त्यापासून दूर राहातात. काही ठिकाणी सासरचे जबरदस्तीने तिला तिच्या इच्छेविरुद्ध माहेरच्या संपत्तीतील तिचा हिस्सा मागायला लावतात, हा आणखी एक वेगळा तिच्या शोषणाचा विषय आहे.

समाजात आईवडील आपल्या मुलामुलींवर समान प्रेम करतात, त्यांच्या दृष्टीने मुलगा आणि मुलगी सारखीच असते असे म्हटले जाते; परंतु एखाद्या मुलीने आपल्या आईवडिलांकडे भावाप्रमाणेच समान हिस्सा मागितला तर किती आईवडील याचे स्वागत करतील याबद्दल शंकाच आहे. उलट 'तुला हवं ते सगळं तुझ्या लग्नात दिलं आहे. आता तू माहेरची पाहुणी आहेस. आपल्या भावांनी प्रेमाने काही चोळीसाडी केली तर स्वीकारावी नाहीतर दोन दिवस माहेरी राहून आनंदाने आपल्या सासरी परत जावे' असे संस्कार तिला कळत्या वयापासूनच दिले जातात.

काही पालक मात्र आपल्या हयातीतच आपली संपत्ती आपली मुले आणि मुली यांच्यामध्ये वाटून देतात; परंतु ती किती प्रमाणात समसमान असते, याबद्दलही शंका वाटते. शिक्षित पालक आपल्या मुलींना स्वखुशीने आपल्या स्वकष्टार्जित संपत्तीमधील काही भाग, एखादा प्लॉट, फ्लॅट देतात; तरीही मुलाइतका समान वाटा देणारे पालक किती असतील हाही एक वेगळाच संशोधनाचा विषय आहे.

आईवडिलांच्या माघारी माहेरी कुणी गोड बोललं आणि पदराला चार भाकरी बांधून दिल्या तरी खूप मोठी गोष्ट आहे, अशी समाजातील सर्वच स्त्रियांची साधारण अपेक्षा असते. परंतु तीही कित्येक स्त्रियांच्या वाट्याला येत नाही हेही एक वेगळे वास्तव आहे. काही स्त्रिया लग्नानंतर नवऱ्याने सोडून दिले म्हणून किंवा अविवाहितपणामुळे माहेरीच राहात असतात. त्यांचा कायदेशीर अधिकार असूनही समाजमान्यता नसल्यामुळे आणि काही वेळा जागरुकता नसल्यामुळे मालक असूनही आश्रितासारखे जीवन जगत असल्याचे आपण समाजात पाहातो.

समाजात कुठल्याही पुरुषाने आयुष्यभर काहीच कमावले नाही तरी वडिलोपार्जित संपत्ती मात्र त्याला हमखास मिळते. परंतु स्त्रियांना मात्र सगळं असूनही काही नसल्यासारखं वंचिताचं जीवन जगावं लागतं.

कायदा सर्व स्त्री-पुरुषांना सन्मानाने जगण्यासाठी समान अधिकार देतो, हक्क देतो, त्यांच्या जपणुकीसाठी तरतुदी करतो. परंतु त्या व्यक्तीचे अधिकार तिला दिले जाण्यासाठी किंवा वास्तवात येण्यासाठी समाजमन तयार नसते. अशी सामाजिक मानसिकता जोपर्यंत तयार होत

नाही, तोपर्यंत कितीही अधिकार दिले, कितीही कायदे केले तरी ते कागदावरच असणार हे निश्चित.

समाजातील 'प्रत्येक स्त्री' आपला माहेरातील वडिलोपार्जित संपत्तीवरील अधिकार सोडून देऊन खरे तर एक प्रकारे आयुष्यभरासाठी तिच्या माहेरातील पुरुषांना आपले ऋणी बनवत असते; परंतु याउलट तिलाच माहेरी आली आणि काहीतरी किमती दिले, काही आर्थिक मदत केली की उपकाराच्या भावनेखाली ठेवले जाते.

स्त्रिया जोपर्यंत आपले अधिकार, हक्क यांच्याविषयी आवाज उठवत नाहीत, तोपर्यंत सगळंच गोड असतं. ती लाडकी ताई असते, आईनंतरची माय असते; परंतु तिने हक्काची भाषा केली की ती अप्पलपोटी, स्वार्थी ठरते. आईवडिलांच्या दृष्टीनेसुद्धा स्त्री आपमतलबी ठरते. मुलींना लग्नासारख्यावेळी अपेक्षा पुरवून तुला 'सगळं' दिलं असं म्हणत असतील तर मुलाला तर सगळं केरसुणीपासून घरातल्या कपाटाच्या चावीपर्यंत देतात. मग तरीही त्याचा हक्क केवळ मुलगा म्हणून अबाधित असतोच.

मुली, स्त्रिया आपल्या हक्काचं काहीच मागत नाहीत; म्हणून सारं अलबेल आहे. जेव्हा प्रत्येक स्त्री आपल्या सर्व प्रकारच्या अधिकारांबद्दल जागरूक होऊन आपले अधिकार मागेल तेव्हा तिच्यावर किती खरंखुरं प्रेम केलं जातंय, हे पाहाणं आनंददायी असेल की दुःखद हे काळच ठरवेल. काही स्त्रिया जागरूक झाल्या आणि मागू लागल्या तर अशी अवस्था आहे, कल्पना करा, सगळ्याच स्त्रिया हक्कांसाठी जागरूक बनल्या तर?

**(लेखिका महा. अंनिसच्या कोल्हापूर शहर शाखेच्या कार्याध्यक्षा आहेत.)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक १० वरून)**

या हल्ल्यात बळी गेलेल्यांच्या नातेवाईकांना. पहलगामचा हल्ला, त्यानंतर पर्यटकांना स्थानिक मुस्लिमांनी केलेली मदत यामुळे हल्ल्याचे निमित्त करून इथल्या मुस्लिमांना टार्गेट करण्याचे अतिउजव्या हिंदुत्ववाद्यांचे कारनामे त्यांना थांबवावे लागले. असे असले तरी मुस्लीमद्वेष काही जणांच्या मनात इतका खोलवर रुजला आहे की त्यातून देशासाठी लढणारी कर्नल सौफिया कुरेशीही सुटली नाही. भाजपाचे मध्यप्रदेशचे मंत्री विजय शाह बोलताना म्हणाले, 'तुम्ही आमच्या बहिणींचा सिंदूर पुसला; पण आम्ही तुमची बहीणच तुमच्या समाचाराला पाठवली.' पाकिस्तान-विरुद्ध लढणाऱ्या एका लढाऊ भारतीय स्त्रीची ती केवळ धर्माने मुस्लीम आहे म्हणून यांनी केलेली नालस्ती मुस्लिमांबद्दल त्यांच्या मनात असलेला द्वेषच दाखवून देते.

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. इथे धर्माच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला वेगळा न्याय देता येणार नाही किंवा धर्माच्या आधारे त्याचे मूल्यमापन करता येणार नाही. बळी पडलेली व्यक्ती कोणत्याही धर्मातील असो तिला न्याय मिळालाच पाहिजे. दहशतवादी एका विशिष्ट धर्मातील आहे म्हणून त्या धर्मातील लोकांना लक्ष्य करणे हे भारतीय संविधानाच्याविरोधी आहे. युद्ध हा काही दहशतवादावरील उपाय नव्हे. युद्धाने भूमी जिंकता येते माणसांना नाही. माणसांना जिंकायचे असेल तर प्रेम, शांती, सौहार्दाचा मार्गच अवलंबावा लागेल. जो अशोकाने स्वीकारला अन् आपल्या राज्याला प्रगतीपथावर नेले. बुद्धाचा मार्ग स्वीकारावा लागेल. 'युद्ध नको बुद्ध हवा' असे म्हणत असताना बुद्ध सांगतो,

**'न हि वेरेन वेरानी सम्मंतिथं कुदाचनम ।**
**अवेरेन चं सम्मंती ऐस धम्मो सनन्तनो ।।'**

वैराने वैर जिंकता येत नाही, अवैराने म्हणजेच प्रेमानेच वैर संपवता येते.

●

**वाचक प्रतिक्रिया :** एप्रिल २०२५ चा अंनिसचा अंकातील जोगदंड सरांचे संपादकिय वाचले. नावाप्रमाणे उत्तमच विचार मांडले आहेत. विवेकाचा मार्ग गेल्या दहा वर्षात किती खडतर झाला आहे याची जाणीव वाचल्यावर होते व सरांनी म्हटल्याप्रमाणे विवेक जागृत असलेले तुफानातील हे दिवे जोपर्यंत तेवत आहेत तोपर्यत सनातनी शक्ती यशस्वी होणार नाहीत. फक्त या दिव्यांना संघटनेच्या शक्तीच्या तेलाचा पुरवठा अखंडीतपणे व्हायला हवा. संघटनेची शक्ती वाढविण्याचे काम अंनिस ही पत्रिका करत आहे. उत्तम सरांचे अभिनंदन!

**रमेश वनारसे**, शहापूर (ठाणे)



# भावना दुखावण्याचा आजार

**जगदीश काबरे** । सांगली
मो. ९९२०१९७६८०

हल्ली कुणी धर्मचिकित्सा करायला लागले की, धर्मांध लोक 'आमच्या भावना दुखावल्या', अशी कोल्हेकुई सुरू करतात. पण भावना दुखावणे हे प्रकरण तसे चार्वाक काळापासूनचे जुनेच दुखणे आहे.

तुकारामांच्या अभंगांनी जेव्हा धर्मातील भोंदूगिरी आणि कर्मकांडावर प्रहार केले, तेव्हा मंबाजी भटासारख्या लोकांच्या भावना दुखावल्या आणि त्यांनी तुकारामांचा आयुष्यभर छळ केला. शेवटी सदेह वैकुंठाला पाठवले.

नामदेवांनी जेव्हा कुप्रथा आणि रुढींवर त्यांच्या अभंगातून ताशेरे ओढले तेव्हाही सनातन्यांच्या भावना दुखावल्या. परिणामी, सनातन्यांनी केलेल्या छळामुळे त्यांना महाराष्ट्र सोडावा लागला.

राजा राम मोहन रॉय यांनी सतीची चाल बंद व्हावी म्हणून कायदा करण्याचा दबाव ब्रिटिशांवर आणला, तेव्हाही बंगाली सनातनांच्या भावना दुखावल्या आणि त्यांच्या विरोधात गरळ ओकायला सुरुवात केली.

आगरकरांनी जेव्हा विधवा विवाह, केशवपन, प्रेतसंस्कार यावर तसेच अनेक रूढींवर सडेतोड टीका केली, तेव्हाही सनातनांच्या भावना दुखावल्या. परिणामी, त्यांची जिवंतपणी प्रेतयात्रा काढण्यात आली.

फुले दाम्पत्याने जेव्हा स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली तेव्हाही सनातन्यांच्या भावना दुखावल्या, त्यांच्यावर शेणगोळे तर घरावर दगड फेकण्यात आले. एवढेच काय पण महात्मा फुलेंवर मारेकरी धाडण्याइतपत त्या नराधमांची मजल गेली.

स्त्रियांना समान हक्क देणारे 'हिंदू कोड बिल'चे समर्थन करणाऱ्या आंबेडकरांना सनातन्यांनी भावना दुखावल्यामुळे कडाडून विरोध केला.

र. धों. कर्वे यांनी समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमनाचा प्रसार करत आयुष्य वेचले, तर त्यांना स्वतःला उच्च सुसंस्कृत म्हणवणाऱ्या ब्राह्मणांनी समाजात अनीती पसरवणारा अधम म्हणून शिव्याशाप दिले.

दाभोलकर, पानसरे, कुलबर्गी यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करताना धर्मावर आणि दांभिक धर्ममार्तंडांवर घणाघात केल्याने सनातन्यांच्या भावना दुखावल्यामुळे त्यांच्या हत्या केल्या गेल्या.

वरील सर्व उदाहरणांवरून हे लक्षात येईल की, प्रत्येकवेळी समाजसुधारणा करणाऱ्या सुधारकांचा सनातन्यांनी भावना दुखावल्या म्हणून या ना त्या प्रकारे नुसता छळच केला नाही तर प्रसंगी हिंस्र श्वापदासारखे वागून निर्ममपणे त्यांच्या हत्याही केल्या. म्हणे, हिंदुत्व हे सहिष्णू आहे! सुधारकांचा छळ करणे, प्रसंगी हत्या करणे यालाच ते सहिष्णुता समजतात काय? तेव्हा प्रश्न पडतो की, हाच का सनातन्यांचा महान धर्म जो स्त्रिया आणि बहुजनांना माणूस म्हणूनही किंमत देत नाही! हाच का तो 'गर्वसे कहो...' वाला धर्म जो सनातन्यांना आपल्या विरोधी विचाराच्या माणसांना संपवण्यासाठी उद्युक्त करतो!! हाच का तो उच्च, सुसंस्कृत (?) धर्म जो शेकडो वर्षे बहुजनांना शिक्षण नाकारणारा, जातीयतेच्या नरकात आणि गरिबीत ढकलणारा आहे! 'भावना दुखावल्या' असा कंठशोष करणारे सनातनी हे विसरतात की, त्यांनी शेकडो वर्षे स्त्रिया आणि बहुजनांच्या भावना दुखावल्या, तेव्हा मात्र त्यांना तो हक्क वाटत होता आणि आज थोडासा त्रास व्हायला लागला तर कोल्हेकुई सुरू केली- 'आमच्या भावना दुखावल्या' म्हणून! अशा वेळी ते कातडीबचावू प्रतिवाद करत म्हणतात की, तो भूतकाळ झाला. आत्ता कशाला उकरून काढताय? ठीक आहे, पण मग तुम्ही तरी का वेद-पुराणे, रामायण, महाभारतातले दाखले देऊन इतिहासाचा आधार घेता? आमच्याकडे पूर्वीच सगळे शोध लागले आहेत. पुष्पक विमानापासून दूरदर्शन ते अण्वस्त्रापर्यंत, असे उच्चारवाने का सांगता? म्हणजे आम्ही इतिहासाचा आधार घेतला तर तो भूतकाळ म्हणून सोडून द्यायचा आणि तुम्ही मात्र इतिहासाचा 'गर्वसे कहो...' म्हणून आधार घेणार! यालाच दांभिकपणा म्हणतात. त्यांना एक सांगावेसे वाटते की, धार्मिकांनो, तुमच्या भावना जशा रूढी, कुप्रथा-परंपरा, व्रतवैकल्ये आणि देवाधर्मावर टीका केल्यास

दुखावल्या जातात तशाच सामाजिक दुराचार, अत्याचार, बलात्कार आणि अंधश्रद्धांचे समर्थन केल्यावर आम्हा विवेकी लोकांच्या भावनाही दुखावल्या जातात. जेव्हा कोणत्याही स्त्रीला देवळात देवदासी बनवून संपूर्ण आयुष्यभर तिचे धर्माच्या नावाखाली शोषण केले जाते तेव्हा आमच्या भावना दुखावतात.

श्रद्धेच्या नावाखाली दाखवलेला प्रसाद पुजारी मंडळी स्वतः ओरपतात तेव्हा आमच्या भावना दुखावतात. ढोल-ताशे बडवत मिरवणुका, रथ यात्रा-जत्रा, वाऱ्या काढून लोकांच्या नेहमीच्या सुरळीत जीवनात अडथळा निर्माण करता आणि सामाजिक बंधनांना जुगारून धार्मिक तणाव निर्माण करता, अशावेळेस आमच्या भावना दुखतात. कोणत्याही धार्मिक समारंभात मोठ्या प्रमाणात लाऊडस्पीकर लावून ध्वनिप्रदूषण करता आणि मुलांच्या अभ्यासात व्यत्यय आणता, आजारी ज्येष्ठांना कर्कश आवाजाचा त्रास देता तेव्हा आमच्या भावना दुखावतात. डॉक्टर, इंजिनीअर, वैज्ञानिक तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कलेक्टर असे उच्चशिक्षित होऊनही लग्नासाठी कमी शिकलेल्या पुरोहिताकडे मुहूर्त शोधायला जाता तेव्हा आमच्या भावना दुखावतात. रुग्णालये, वाचनालये आणि शाळा बांधण्यासाठी फंड गोळा करताना हात आखडता घेता पण मंदिराच्या बांधकामासाठी सढळ हस्ते मदत करता तेव्हा आमच्या भावना दुखावतात. टीव्ही, मोबाईल, संगणक, ध्वनिक्षेपक, युट्युब आणि इंटरनेट या सगळ्या आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर आपण अंधश्रद्धा वाढवणारा मजकूर फॉरवर्ड करण्यासाठी करता आणि लोकांना धर्मांध करणाऱ्या व्याख्यानांसाठी करता तेव्हा आमच्या भावना दुखावतात. शिक्षित भक्त स्त्रीभ्रूण हत्या, हुंडाबळी आणि देवळातच देवासमोर पुजारी बलात्कार करतात, तसेच बलात्कारी बाबाबुवांसमोर नैतिकतेचा टेंभा मिरवणारे संस्कृतीरक्षक नतमस्तक होतात तेव्हा आमच्या भावना दुखावतात. स्त्रियांना दुय्यम स्थान देणारी व्रतवैकल्ये करायला लावता आणि सत्यनारायणाच्या पूजेसारख्या अशास्त्रीय पूजा करता तेव्हा आमच्या भावना दुखावतात. मुलगा-मुलगी असा भेद करत मुलांना वाढवता आणि पुरुषी मर्दानगीचा टेंभा मिरवता तेव्हा आमच्या भावना दुखावतात.

एवढंच जर धार्मिकांना विवेकवाद्यांनी त्यांच्या भावना दुखावू नयेत असे वाटत असेल तर त्यांनीही विवेकवाद्यांच्या भावना दुखवता कामा नयेत, हे लक्षात ठेवावे. आम्ही तर म्हणतो सगळे जातीधर्म गाडूनच टाका आणि माणसाला माणूस म्हणून जगू द्या, मग आजच्या सारखे तू तू मैं मैं होणार नाही आणि मानव जात सुखी होईल. कुणी कुणाचीही उणीदुणी काढणार नाही. धर्मचिकित्सा ही नेहमीच आत्मपरीक्षण करण्यासाठी असते. कारण जेव्हा माणूस स्वतःची चूक आपल्याच मनाशी स्वीकारतो तेव्हाच बदल व्हायला सुरुवात होते. म्हणूनच धर्मचिकित्सा करताना ज्यांच्या भावना दुखावतात ते एकतर प्रवाहपतित तरी असतात किंवा त्यांच्या हितसंबंधांना बाधा येऊन त्याचे स्थान डळमळीत होण्याची त्यांना भीती वाटत असते. त्यामुळे त्यांच्या खरे पाहाता भावना नाही तर अहंकार दुखावतो. आजार जर जुनाट असेल तर तो बरा होण्यासाठी जशी कडू गोळी खावी लागते, तसेच समाजसुधारणा करताना कठोर विचारांचे कडवट शब्द पचवायलाच हवे. जर लोकांना विचारी करायचे असेल आणि समाजसुधारणा करायची असेल तर भावनेपेक्षा बुद्धीला महत्त्व दिले पाहिजे. कारण भावना माणसाला प्रसंगी हिंस्त्र करतात. बुद्धी मात्र नेहमीच माणसाला विवेकी बनवते. तेव्हा 'भावना दुखावल्या' असा कंठशोष करणारे सनातनी हे विसरतात की, त्यांनी शेकडो वर्षे स्त्रिया आणि बहुजनांच्या भावना दुखावल्या, तेव्हा मात्र त्यांना तो हक्क वाटत होता. आज तुमच्या त्या नतद्रष्टपणावर होणाऱ्या टीकेमुळे थोडासा त्रास व्हायला लागला तर कोल्हेकुई सुरू केली- 'आमच्या भावना दुखावल्या म्हणून!' व्वा रे!! मग असल्या गळूसारख्या ठसठसणाऱ्या दूषित भावना दुखावल्या म्हणून आम्ही चिंता का करावी? उलट तो समाजविघातक गळू फोडून समाजात प्रबोधन करून समाजस्वास्थ्य निर्माण करणे हे सुधारकांचे कर्तव्यच असते.

अशा दांभिक धर्मांधांच्या भावना दुखावणाऱ्यांचा सावरकरांनी खरमरीत शब्दात समाचार घेतला आहे. वि. दा. सावरकर 'विज्ञाननिष्ठ निबंध' या पुस्तकात म्हणतात... ''आपल्या हिंदुसमाजातील स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदीप्रभृति अनेक धार्मिक म्हणून मानल्या गेलेल्या रुढींपायी आज आपल्या राष्ट्राची किती अपरिमित हानी होत आहे ते दाखवून त्याचे आणि अशाच विविध प्रकारच्या धार्मिक छापाच्या भाबडेपणाचें उच्चाटन करण्यासाठी झटत असता आम्हांस असे

आढळून आले की, अनेक सनातनी मंडळींकडून आमच्या सुधारक मंडळींवर जे स्थिरटकीय (स्टीरिओ टाईप) ठाम आक्षेप घेतले जातात, त्यात लोकांच्या धर्म भावना तुमच्या या प्रचारामुळे दुखतात; म्हणून तुमच्या ह्या सुधारणा गर्हणीय होत! हा एक आक्षेप नेहमी येतो. त्या सुधारणा राष्ट्रहितास आवश्यक आहेत की नाहीत हा प्रश्नच जणू काय विचारात घेण्याचे कारण नाही. तीच गोष्ट धर्मभावनांची. धर्म असेल तर त्याविषयींच्या सद्‌भावना दुखवू नयेत हे ठीकच आहे; पण जर एखाद्या अधर्माला धर्म समजत असेल आणि जर त्या अधर्माविषयीच्या त्यांच्या भावना इतक्या धर्मवेड्या असतील, की आमच्या सभ्य नि सदिच्छ उपदेशानेही त्या दुखावतील, तर अशा प्रसंगी त्या अधर्मभावना दुखविणेच खरे धर्मकृत्य ठरते, अधर्मभावना तशा अर्थी दुखविल्यावाचून गत्यंतरच उरत नाही.

सावाला चोराच्या तडाख्यातून सोडविताना चोराच्या भावना दुखावतात; मरू द्या त्या सावाला, असे म्हणावयाचे की काय? आपली आई वाताच्या झटक्यात खिडकीतून खड्डयात उडी मारू लागली तर तशा प्रसंगी तिच्या भावना कितीही दुखावल्या तरी त्या दुखवून तिला तशी प्राणघातक उडी न मारू देणे हेच खऱ्या मातृभक्तीचे कर्तव्य होय, खरा पुत्र धर्म होय. तीच गोष्ट राष्ट्रभक्तीची आणि स्वधर्मभक्तीची होय. राष्ट्रहितास अत्यंत हानिकारक अशा ज्या ज्या धार्मिक रूढी तुम्हांस वा आम्हांस लोकविकृष्ट वाटतात, त्यांचा उच्छेद करण्यासाठी झटणे, हेच तुमचे वा आमचे राष्ट्रीय कर्तव्य होय.'' हे सगळे विचार लक्षात घेतले तर मला वाटते आता भावना दुखावणे हा आजार नष्ट व्हायला हरकत नाही. कसे?

**(लेखक विज्ञान प्रसारक आहेत.)**

●

## संत कबीर




जंत्र-मंत्र सब झूठ है, मित भरमो जग कोय।
सार शब्द जानै बिना, कागा हंस न होय।।
यंत्र-मंत्र और टोने-टोटके सब झूठे हैं।
इनके भ्रम जाल में नहीं फँसना चाहिए।
जो आदमी सत्य वाणी बोलना नहीं जानता हो, वह ज्ञानी नहीं हो सकता। जैसे कौआ लाख चाहकर भी हंस नहीं बन सकता।

(मंत्र-तंत्र-जादूटोणा हे सर्व खोटे आहे. याच्या भ्रम-जालात फसू नये. ज्या माणसाला सत्य वाणी बोलणे माहीत नसते तो ज्ञानी होऊ शकत नाही, ज्याप्रमाणे कावळ्याची लाख इच्छा असली तरी तो हंस होऊ शकत नाही.)

**पान १०१: कबीर दोहावली, प्रभात प्रकाशन**

## साने गुरुजी



जे सत्य असते ते काळाच्या ओघात टिकते,
असत्य असते ते अदृश्य होते.
स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे,
स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी.



# हम साथ साथ है...

**विनायक सावळे** । शहादा (नंदुरबार)
मो. ९४०३२५९२२६

एक जुनं गाणं आहे. खूप प्रसिद्ध सुरेश वाडकर यांनी गायलेलं.

'मुझको देखोगे जहाँ तक,
मुझको पाओगे वहाँ तक,
रास्तो से कारवाँ तक,
इस जमीं से आसमाँ तक,
मैं ही मैं हुँ, मैं ही मैं हुँ
दुसरा कोई नही...'

खरंतर चित्रपटात याचे संदर्भ वेगळे आहेत. त्याच्या प्रेयसीच्या प्रेमात तो इतका आकंठ बुडालेला असतो की, त्या धुंदीत त्याला सगळीकडे स्वतःचीच प्रतिमा दिसते. दुसरं कोणीही दिसत नाही. जमिनीपासून तर आकाशापर्यंत केवळ तोच...तोच आणि तोच. मग आता हे गीत मी तुम्हाला का सांगतोय? सामाजिक संघटनांमध्ये देखील काही वेळा 'मैं ही मैं हुँ' अशी परिस्थिती दिसून येते. फरक इतकाच की, व्यक्ती इथे अन्य कोणाच्या प्रेमात नाही, तर स्वतःच्याच प्रेमात आणि प्रतिमेत आकंठ बुडालेली असते. काही वेळा परिस्थितीजन्य इतरही कारणे असू शकतात. आता माझा एक अनुभव सांगतो. मी एकदा एका शाखेत भेटीला गेलो होतो. ठरल्याप्रमाणे शाखेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांच्या घरीच बसलो. चहा-नाश्ता झाला. दरम्यान गप्पाही सुरू होत्या. शाखेच्या झालेल्या कामाचे ते मला रिपोर्टिंग करीत होते. शाखेमध्ये अनेक कार्यक्रम झालेले दिसून आले. शाळांमध्ये चमत्कारांचे सादरीकरण, गावांमध्ये जाहीर कार्यक्रम, विज्ञान बोधवाहिनीचे तारांगणाचे कार्यक्रम, एका बाबाचा भांडाफोड, शिक्षकांचे शिबिर, काही अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या भेटी. असे भरगच्च कार्यक्रम झालेले.मला खूप आनंद झाला. शाखा चांगली क्रियाशील वाटली. मग त्यांनी माझ्या हातात एक फाईल आणि फोटोंचा अल्बम दिला. फाईलीत तारीखवार बातम्यांची कात्रणे लावलेली होती. भरपूर कात्रणे होती. बातम्या बघितल्यानंतर, फोटोंचा अल्बम बघितला. प्रत्येक कार्यक्रमाचे फोटो नीट लावलेले. पण बघताना एक गंभीर गोष्ट लक्षात आली, सर्व बातम्या आणि फोटोंमध्ये तेच ते होते, त्यांच्या व्यतिरिक्त किरकोळ वगळता अन्य दुसरा कार्यकर्ता नाही. नियोजन करायला, भाषण करायला, मान्यवरांच्या भेटी करायला, निवेदन देताना सर्व ठिकाणी तेच दिसत होते. जाहिराती, देणगी संकलन देखील त्यांनी एकट्यानेच केलेले होते. शाखा मात्र बऱ्यापैकी जुनी. मला प्रश्न पडला, गेले १० वर्षे इथे हीच एकमेव व्यक्ती कशी काम करतेय? दुसरा एकही कार्यकर्ता कसा नाही? 'मैं ही मैं हुँ' अशी परिस्थिती का?

मग मला परत आठवलं. त्यांचे फेसबुक बघा, इन्स्टाग्राम बघा तेथे प्रत्येक कार्यक्रमाचे फोटो टाकलेले. पण त्यात तीच व्यक्ती, एकटीच, एकमेव यामागे कारणे काय? मग मी प्रश्न केला.

मी : असं कसं? प्रत्येक ठिकाणी तुम्ही एकटेच कसे?

ते : काय करणार? कोणीही येत नाही. इतका प्रयत्न करतो मी, तरी कोणीही प्रतिसाद देत नाही.

मी : इतकी वर्षे झाली तुम्हाला, दोन-चार तरी नवीन लोक जुळायला हवे होते ना!

ते : मी प्रयत्न खूप केले. अजूनही करतोय. पण हे काम करायला कोणीही तयार होत नाही. काय करायचं आता लोकांचं?

असा साधारणपणे संवाद झाला. आता आपण थोडा विचार करू. दहा वर्षे जुन्या असलेल्या शाखेकडे केवळ एकच व्यक्ती कशी असू शकते? एकही नवा माणूस मिळू नये? हे कसं शक्य आहे? काय झालं असेल? त्यांनी प्रयत्न केले नसतील का? की योग्य दिशेने प्रयत्न केले नसतील? की त्यांनाच कोणी नको आहे? एकट्यानेच काम करायचे आहे? का त्यांचे व्यक्तिमत्त्व इतके आत्मकेंद्री आहे हे की, अन्य कोणी त्यांच्या आसपासही फिरकत नसेल? की त्यांना नवीन माणसं मिळवण्याचं महत्त्वच नसेल? अशा आणि यापेक्षा वेगळ्या काहीतरी शक्यता असतील. यावर उपाय काय?

मग आपल्यापुढचा प्रश्न असा आहे, ज्यांना संघटना

चालवायची आहे, टिकवायची आहे आणि वाढवायची आहे त्यांनी काय करायला हवे? तसेच अंधश्रद्धासारख्या संवेदनशील विषयावर काही शेकडो वर्ष काम करावे लागेल. अशा चळवळीत आपण काय उपाय करू शकतो? आधी आपल्याला कारणांचा शोध घ्यायला हवा. जर त्या व्यक्तीने प्रामाणिक प्रयत्न केले असतील तर त्या प्रयत्नांत नेमकी काय अडचण झाली? हे तपासायला हवे. त्यांना पुरेपूर मदत करायला हवी. पण जर ती व्यक्ती केवळ आत्मगौरवात रमणारी असेल, तर त्यांच्याशी मोकळेपणाने बोलावं लागेल. दुसऱ्याकडे जराही याची वाच्यता न करता थेट त्यांच्याशी चर्चा करावी लागेल. याला व्यावसायिक भाषेत 'टफटॉक' (tough talk) असे म्हणतात. तो करावा लागेल. टफटॉक याचा अर्थ, 'स्पष्ट, मोकळा आणि प्रत्यक्ष संवाद. म्हणजेच काहीही न लपवता, न टाळता जे वाटते ते मोकळेपणाने बोलणे' असा घ्यावा. थोडक्यात, रोकडा संवाद असे म्हणूया. अनेकदा ते नाराज होतील, त्यांना वाईट वाटेल, आता जे काही काम सुरू आहे, ते ही थांबवतील, कदाचित आपल्याशी भांडतील, आपल्यावर चिडतील या भीतीने टफटॉक टाळला जातो. या टाळण्याने तिघांचे नुकसान होते. एक म्हणजे समोरच्याला नवा दृष्टिकोन, योग्य कार्यपद्धती समजण्याची शक्यता दुरावते. त्यांचे नुकसान. दुसरे म्हणजे आपल्याला अडचणी व नवीन कार्यकर्ते न येण्याची कारणे कळण्याच्या शक्यता संपतात आणि तिसरे म्हणजे, संघटना वाढीला ब्रेक लागतो, संघटना प्रवाही न राहाता व्यक्तीकेंद्री बनण्याची स्थिती तयार होते. यासोबतच आपण मोकळेपणाने बोलू शकत नसल्याने आपणच अस्वस्थ राहातो. मग दुसऱ्या कोणाशी त्याबद्दल बोलतो. त्यातून गैरसमज वाढत जातात. प्रश्न अधिकच चिघळत जातो.

टफटॉक टाळण्यामागे लोकांना दुखवायचं नाही, तोडायचे नाही, नाराज करायचं नाही, माणसं सांभाळायची, ॲडजेस्ट करत राहायचं या भूमिकेत गेलो तर संघटना सक्षम करणे, वाढवणे हे ध्येय बाजूला राहाते आणि लोकांना सांभाळणे, खूश करणे, खूश ठेवणे हे ध्येय होते. मग लोक आनंदाने कामात येतात, जमेल तसं काम करत राहातात किंवा काहीच करत नाहीत. पण तरी ते तेथेच राहातात. संघटनेत 'सब चलता है' अशी कार्यसंस्कृती तयार होते. अशी संघटना हळूहळू स्वतःच थिजत जाते, थांबत जाते, संपत जाते. असे होवू नये यासाठीच टफटॉक हा एक उत्तम पर्याय आहे. शेवटी लोकशाही कार्यपद्धती मानणाऱ्या संघटनेत संवादाला अनन्यसाधारण महत्त्व असते. संघटनांतर्गत कोणतेही प्रश्न संवादाने सुटू शकतात अशी धारणाच नव्हे तर विश्वास असतो. त्या अर्थाने टफटॉक हा कठोर असला तरी एक प्रकारचा संवादच असतो.

या कठीण संवादात ज्या व्यक्तीसोबत बोलायचे त्या कार्यकर्त्याचे संघटनेतील पद काय? त्या पदाच्या जबाबदाऱ्या कोणत्या? त्याची कार्यपद्धती काय? अधिकार-जबाबदाऱ्या कोणत्या? हे मोकळेपणाने बोलणे, कामातील त्यांच्या वास्तव अडचणी समजून घेणे, संघटनेच्या नेमक्या अपेक्षा मोकळेपणाने सांगणे, जबाबदारीची नेमकी जाणीव करून देणे, गरजेच्या ठिकाणी स्वतः त्यात मदतीची तयारी ठेवणे, व्यक्तिगत आरोपाच्या पातळीवर जराही न जाता कामाचा आणि कार्यपद्धतीचा संवाद करणे आवश्यक असते. या संवादात सामूहिक कामाचे महत्त्व, जबाबदाऱ्या वाटून दिल्याने वाढणारा कामाचा प्रभाव, निर्णयप्रक्रियेत सगळ्यांचा सहभाग, नव्या लोकांना संधी दिल्याने कामाचा होणारा विस्तार हे नीट समजून देणे अपेक्षित असते. एकटे का असेना पण तो काम करतो याचेही महत्त्व अधोरेखित करणे आवश्यक असते, म्हणून तू आम्हाला हवा आहेस हे देखील स्पष्टपणे सांगणे आवश्यक असते. हा कठीण संवाद ज्या कोणी करायचा असतो त्याने मात्र स्वतःच्या जबाबदारीला, कर्तव्याला तितकाच चांगला न्याय दिलेला असणे अनिवार्य असते. ही जणू टफटॉकची पूर्वअटच आहे. टफटॉक नीट करणे हे कौशल्य आहे. मुळात याचा हेतू प्रश्न दोघांनी नीट समजून घेणे आणि त्यावर उत्तर शोधणे हा असतो. त्या उत्तरात दोघांची भागीदारी असणे हे यशस्वी टफटॉकचे वैशिष्ट्य असते. हे कठीण असते, प्रत्येक वेळेस यशस्वी होणारच असे नाही. पण सामाजिक संघटनेमध्ये हे तुम्हाला कधी ना कधी करावे लागते. तुमच्या वाट्याला, तुमची इच्छा असो की नसो असे प्रसंग येणारच.

टफटॉक करताना घ्यावयाची काळजी

- हे बोलणे खाजगीत करायचे असते. जाहीर बैठकीत नव्हे.
- कोणत्याही परिस्थितीत समोरच्या सहकाऱ्याचा अपमान होता कामा नये.
- निर्माण झालेल्या प्रश्नांची चर्चा करावी. उत्तरं

शोधावीत. आरोपाच्या पातळीवर जाऊ नये.

- माणूस आपण गमावणार नाही, याची पुरेपूर काळजी घ्यावी.
- संबंधित व्यक्तीला ज्या क्षेत्रात गती आहे, त्या क्षेत्राची जबाबदारी घेण्याबाबत बोलावे.
- हा संवाद मैत्रीपूर्णच असावा. आपण कोणीतरी बॉस व संबंधित व्यक्ती दुय्यम कर्मचारी किंवा नोकर असा अजिबात फील येता कामा नये. आपल्या कामातील सहकारी अशीच भावना असावी.

दुसरा मार्ग पर्यायी किंवा पूरक माणसे शोधण्याचा असतो. त्यासाठी स्वतःचा प्लॅन तयार करणे, त्याची वेळ व श्रमाची गुंतवणूक, कार्यपद्धती, जबाबदारी असे लिखित नियोजन करणे व त्यासाठी प्रयत्न करणे हा असतो. यासाठी निराश न होता सातत्याने प्रयत्न करावे लागतात. याचे सूत्र मागील एका लेखात आपण दिलेले आहे. फिरा, भेटा, ऐका, बोला, सातत्य हे याचे सूत्र आहे. तिसरा आणि महत्त्वाचा एक मार्ग संघटनेत जबाबदारीची जाणीव आणि कामगिरीचा आढावा घेणारी व्यवस्था तयार करणे आवश्यक असते. ठरावीक वेळेत प्रत्येकाला कामाबद्दल विचारणा होणे आवश्यक असते. ही विचारणा तपासणीच्या भावनेने नाही तर कामात काही अडचण आहे का? कोणत्या स्वरूपाच्या मदतीची गरज आहे? या भावनेने करायची असते. ही संघटनेची कार्यसंस्कृती असावी लागते. यात नेतृत्वाची सर्वोच्च जबाबदारी असते. नेतृत्वाला दोन पावले अधिक चालावे लागते. इतरांपेक्षा अधिक वेगात धावावे लागते. याबाबत विनोबा भावे यांचा किस्सा ऐकण्यासारखा आहे, भूदान यात्रेच्या दरम्यान विनोबा भावे थकले, आजारी पडले तर त्यांचे अनुयायी त्यांना सांगत की, 'आपण जरा आता आराम करा, थोडं झोपा.' तेव्हा विनोबा म्हणायचे, 'मी जेव्हा धावेन तेव्हा माझे सहकारी चालतील, मी जेव्हा चालेल तेव्हा माझे सहकारी बसतील आणि मी ज्यावेळेस बसेल तेव्हा माझे सहकारी झोपतील आणि मी जेव्हा झोपेल तेव्हा माझे सहकारी काम थांबवतील.' यावरून नेत्याला आपल्या सहकाऱ्यांपेक्षा थोडे अधिक करायचे असते. यातून त्याला या सगळ्या प्रयत्नांसाठी नैतिक अधिकार मिळतो. टफटॉकही करता येतो. सामाजिक चळवळीत कार्यकर्ते घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजत असतात याची देखील नम्र जाणीव असणे आवश्यक आहे.

या मार्गाने गेलो तर 'मैं ही मैं हुँ' जाऊन 'हम साथ साथ हैं' इथपर्यंत आपल्याला संघटना नक्कीच आणता येईल. अर्थात, ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संघटनेला चढउतार येणारच. आपल्या आयुष्यात पण येतातच की. संघटनेच्या आयुष्यातदेखील येतात. 'स्व' ला विसर्जित करीत 'सह' म्हणून काम करणाऱ्यांची टीम जेव्हा एखाद्या संघटनेत कार्यरत असते, त्या संघटनेचा भविष्यकाळ उज्वल असतो, यात जराही शंका नाही.

**(लेखक महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत.)**

●



## राजर्षी शाहू महाराज

ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीचे सतत प्रयत्न ही आमची शस्त्रे असली पाहिजेत. सर्व जातीच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टि दूरवर ठेवा. जातीभेद मोडणे इष्ट आहे, जरूर आहे. जातीभेद पाळणे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत, ही जाणीव पक्की ध्यानात ठेवून मग ह्या दिशेचा प्रयत्न म्हणून जाती परिषदा भरवावा. जातीबंधने दृढ करणे, जातीभेद तीव्र होणे हा परिणाम अशा परिषदांचा होऊ नये, ही खबरदारी घेतली पाहिजे.

# डॉ. शंकर आबाजी भिसे: अफाट शास्त्रज्ञ



**डॉ. नितीन हांडे** । पुणे
मो. ८९५६४४५३५७

लहानपणी एका बालकानं एका विज्ञानविषयक नियतकालिकामध्ये युरोपीय शास्त्रज्ञांचं भारतीय लोकांविषयी मत वाचलं की भारतीय लोक केवळ युरोप, अमेरिकेत लागलेल्या शोधांचा फायदा घेऊ शकतात. मात्र नव्यानं काही निर्माण करू शकत नाही. भारतीयांची केवळ मशीन पुसायची लायकी आहे, असं विधान वाचलं. त्याचवेळी त्या बालकानं ठरवलं होतं की, मी असं मशीन तयार करेल, ज्याची मागणी संपूर्ण जगात असेल आणि युरोप-अमेरिकेतील लोक रोज पुसून स्वच्छ करत त्या मशीनची काळजी घेतील. त्याचं हे मनोरथ त्यानं मोठं झाल्यावर खरं देखील करून दाखवलं आणि कालांतरानं अमेरिकेतील हुज हु मध्ये सर्वात पहिलं भारतीय नाव नोंदवलं गेलं.. ते नाव होतं २०० पेक्षा जास्त शोध लावणारे आणि ४० पेटंट असलेले डॉ. शंकर आबाजी भिसे.



२९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईमध्ये शंकरचा जन्म झाला. त्याचे वडील आबाजी भिसे ब्रिटिश आमदनीत बढती मिळवत मुंसिफ, शिरस्तेदार आणि त्यानंतर सदरअमीन (त्या काळातील मॅजिस्ट्रेट) या पदावर पोचले होते. सरकारी नोकरी म्हणजे आयुष्यभर भाकरी असा समज त्या काळात प्रचलित होता. शंकरच्या घरातदेखील असाच विषय व्हायचा की, शंकरने शिक्षण पूर्ण करून मोठा साहेब बनावं. किमान एखादी छोटी-मोठी सरकारी नोकरी तरी मिळवावी. मात्र हे बाळ शास्त्रज्ञ होईल याचं स्वप्न त्याच्या घरात काय, पूर्ण मुंबई इलाख्यात कुणाला पडलं नसेल. तेव्हा विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी हे विषय आपल्यासाठी नाहीतच असा न्यूनगंड भारतीय लोकांनी बाळगला होता.

शंकरचा बालपणाचा सुरुवातीचा काळ सुरतमध्ये गेला. सहा वर्षांचा असताना शंकरने एक पुतळा पाहिला, ज्याच्या मध्यभागी एक घड्याळ बसवलं होतं. त्या पुतळ्याचे डोळे इकडेतिकडे पाहात आहेत असा भास व्हायचा. छोट्या शंकरला प्रश्न पडला. त्यानं त्यामागील गुपिताचा शोध घ्यायचं ठरवलं आणि त्याला त्यातील यांत्रिक करामत समजली. घड्याळाच्या दोलकाला डोळे असे जोडले होते की प्रत्येक दोलनानंतर डोळे हालचाल करतील. छोट्या शंकरला याचं नवल वाटलं आणि त्याला अभियांत्रिकी विषयात रस निर्माण झाला. शंकरचं प्राथमिक शिक्षण धुळ्यामध्ये झालं. पुढे तो १५ वर्षांचा असताना त्याच्या वडिलांची जळगावमध्ये बदली झाली. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यानं कोळशापासून गॅस निर्माण करणारं यंत्र शोधून काढलं.

१८८८ हे शंकरचं मॅट्रिकचे वर्ष. मात्र त्याला अभ्यासात अजिबात रस नव्हता. त्याला काहीबाही प्रयोग करण्यात रस होता. पाठांतर अजिबात आवडत नव्हतं. संस्कृतच्या शिक्षकांनी तर शंकरच्या वडिलांना सांगितलं की, मी तुमच्या मुलाला शिकवू शकत नाही. त्यानं संस्कृत सोडली, काही दिवस फारसी भाषेशी कुस्ती खेळून पाहिली, मात्र ती देखील फारशी जमली नाही. शेवटी नाईलाज म्हणून इंग्रजीसोबत दुसरी भाषा म्हणून मराठी निवडली आणि मॅट्रिकची परीक्षा पास करून घेतली. किती गंमत ना? ज्या मुलानं नाईलाज म्हणून मराठी घेतलं, आज त्याचा धडा मराठी पुस्तकात आहे.

बालभारतीमधील या धड्यात एक किस्सा सांगितला आहे. मला मात्र तो खरा वाटत नाही. खरा असो किंवा खोटा प्रेरक मात्र नक्की आहे. एकदा शंकरला त्याच्या घरच्यांनी साखर आणायला सांगितली. दुकानदारानं साखर दिली. मात्र त्या वजनाबद्दल शंकरला शंका आली. शंकर म्हणाला, ''दुकानदार काका, तुमचा

वजनकाटा चुकीचा दिसतोय.'' दुकानदार म्हणाला, ''माझा वजनकाटा बरोबरच आहे. तुला शंका असेल तर तू तुझा वजनकाटा बनव.'' छोट्या शंकरनं हे आव्हान स्वीकारून त्याला सांगितलं, ''होय, माझा वजन काटा मी बनवेलच.'' घरी गेल्यावर वडिलांनी ओरडा केला की, ''तूच साखर खाल्ली असशील.'' झाल्या प्रकारानं शंकरने नव्या पद्धतीचा वजनकाटा तयार करायची पक्की खूणगाठ बांधली.

शाळेत शिकत असताना त्याला सायंटिफिक अमेरिकन हे नियतकालिक वाचायला मिळायचं. त्यामुळं भविष्यात आपणदेखील शास्त्रज्ञ व्हायचं आणि एडिसनलादेखील भेटायचं स्वप्न शंकर पाहात होता. मॅट्रिकनंतर शंकरला पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकायचं होतं, मात्र यासाठी त्याच्या घरच्यांचा प्रचंड विरोध होता. लॉ सोडून तुला काहीपण शिकायचं असेल तर तुला घरातून एक दमडीसुद्धा मिळणार नाही. आपण स्वतः कमावून शिकायचं असं २१ वर्षाच्या शंकरनं ठरवलं आणि मुंबईमध्ये येऊन अकाऊंटंट जनरलच्या ऑफिसमध्ये कारकून म्हणून ३० रुपये पगार देणारी नोकरी स्वीकारली. पुढं नऊ वर्षे या रटाळ नोकरीमध्ये काम करत असतानाच त्यांनी त्यांच्या कल्पनेलादेखील चालना दिली आणि नवनवीन उद्योगदेखील सुरू केले.

१८८९ मध्ये मुंबई येथे काँग्रेसचं पाचवं अधिवेशन आयोजित करण्यात आलं होतं. सर विल्यम वेडरबर्न हे त्याचे अध्यक्ष असणार होते. अधिवेशनात एका पुतळ्याचं उद्‌घाटन अभिनव पद्धतीनं करण्यात येणार होतं. आधी तो पुतळा कुणाला दिसणार नाही, पुतळ्यावर हळूहळू प्रकाशझोत टाकून संपूर्ण पुतळा फोकसमध्ये आणायचा. हे काम एका इटालियन कंपनीला दिलं होतं, मात्र त्यांना हा पुतळा पूर्ण अदृश्य करण्यात यश आलं नाही. भिसे यांनी तो पुतळा पूर्ण गायब करून पुन्हा पूर्ण प्रकाशात आणून दाखवला. पुढील पाच वर्षांत त्यांनी छत्रपती शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, राजा रविवर्मा यांसारख्या दिग्गजांसमोर दृष्टीभ्रमाचे अनेक प्रयोग केले. एवढे सफाईदार की त्यांनी केवळ जादूगार म्हणून युरोपला यावं असं अनेक तज्ज्ञ लोकांना वाटत होतं.

१८९३ मध्ये त्यांनी सायंटिफिक क्लबची स्थापन केली. तसेच 'विविध कला प्रकाश' या नावाची पत्रिका सुरू केली. दर महिन्याला क्लबची लोकं एकत्र येत, नवनवीन प्रयोग करून दाखवत. पत्रिकेच्या माध्यमातून ही माहिती जगभर जात असे. नवीन संशोधकांना पेटंट घेण्यासाठी आवश्यक बाबी काय आहेत, नवीन औषधाला कोणकोणत्या चाचण्या पास कराव्या लागतील याचं तिथं मार्गदर्शन आणि आवश्यक मदत केली जात असे. या सामाजिक कामामुळं दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता यांसारख्या नेत्यांच्या नजरेत ते भरले. याचा फायदा त्यांना पुढं उद्योगधंदे सुरू करण्यात झाला. भिसे यांनी मुंबईमध्ये काचेचा कारखाना काढला, आग्र्यात चामड्याच्या वस्तूंचा कारखाना काढला.

१८९५ मध्ये त्यांचा इंग्लंडदौरा पतियाळाच्या महाराजांनी स्पॉन्सर केला. तिथं मँचेस्टरमधल्या फ्री ट्रेड हॉलमध्ये त्यांचे दृष्टीभ्रमाचे प्रयोग अत्यंत यशस्वी झाले. त्याकाळातील इंग्लंडमधील सर्व आघाडीच्या वृत्तपत्रांत त्यांचं नाव चमकलं होतं. १८९६ मध्ये ते परत आले, मात्र भारतात परत आल्यावर त्यांना जातीमधून वाळीत टाकण्यात आलं. समुद्रउल्लंघनाचा दोष त्यांच्या माथी लावण्यात आला. अर्थात, भिसे काही लेचेपेचे खेळाडू नव्हते, त्यांनी कोणतंही प्रायश्चित्त घेतले नाही. कालांतराने भिसे हे खूप मोठं नाव झालं आणि आपल्या जातीत अशी व्यक्ती जन्मली आहे, याचा अभिमान सांगायला हीच वाळीत टाकणारी मंडळी पुढं सरसावली. कारण नंतरच्या काळात त्यांनी संशोधनाचा शब्दशः पाऊस पाडला. पगड्या तयार करण्याचं यंत्र, पिठाच्या चक्क्या, परीटघडी न बिघडवता अंगरख्याची बटणं बसवणारं टिंगी नावाचं यंत्र, बॉडी मसाजर, चटणी वाटायला नव्या प्रकारचा मिक्सर, सौरऊर्जेवर चालणारी मोटार, समुद्राच्या तळाशी भरपूर प्रकाश देणारा दिवा, रेल्वेचा सरकता दरवाजा, ऑटोमॅटिक स्टेशन इंडिकेटर, टॉयलेट फ्लशर, कपडे धुण्यासाठी केमिकल, वातावरणातील विविध वायू वेगळे करणारे यंत्र असे २०० शोध त्यांनी लावले. सर्वच शोध अफलातून मात्र सगळ्यांची नावं देत बसलो तरी लेख खूप मोठा होईल. आपण केवळ खूप महत्त्वाच्या दोन-तीन बाबी पाहू.

१८९७ मध्ये 'इन्व्हेन्टर रिव्ह्यू ॲन्ड सायंटिफिक रेकॉर्ड' या मासिकानं 'स्वयंमापन यंत्र' करण्याची एक स्पर्धा जाहीर केली होती. ऑटोमॅटिक वजन करण्याचं यंत्र जसं पेट्रोलपंपावर सेट केलं असेल, तेवढंच पेट्रोल पडतं, तसं यंत्र किराणा माल मोजणारं. या स्पर्धेसाठी भिसे यांनी

पाठवलेल्या डिजाइनला पहिलं बक्षीस मिळालं. त्यांनी लहानपणीची प्रतिज्ञा पूर्ण केली म्हणायची. यासाठी त्यांना दहा पौंडांचं इनाम आणि लंडनच्या सोसायटी ऑफ सायन्स, लेटर्स ॲन्ड आर्ट्स या संस्थेकडून मानपत्र आणि मानद सभासदत्व मिळालं होतं.

प्रिंटिंग क्षेत्रामध्ये भिसोटाईप यंत्र हा सर्वात मोठा शोध मानण्यात येतो. तत्कालीन मोनोटाईप आणि लिनोटाईपच्या बेस्ट मॉडेलपेक्षा पंधरा ते वीस पट अधिक वेगाने, ३००० शब्द प्रतिमिनिट, तसंच वेगवेगळे फाँट, चित्र यांचा समावेश शक्य असलेलं हे यंत्र मुद्रणव्यवसायात क्रांती होती. या यंत्राबद्दल रतन टाटा यांना समजलं. दादाभाई नवरोजी आणि गोपाळकृष्ण गोखले यांनी देखील भिसेंची शिफारस त्यांच्यापाशी केली होती. १९१० मध्ये द टाटा-भिसे इन्व्हेन्शन सिंडिकेट ही कंपनी लंडन येथे स्थापन झाली. युरोपात भिसे यांचं यंत्र विकलं गेलं. युरोपीय कामगारांकडून पुसलंदेखील गेलं.

संशोधक वृत्ती असेल तर व्यक्ती प्रत्येक गोष्टीमध्ये चिकित्सा करते. आता हेच पहा ना, १९१० मध्ये भिसे आजारी पडले. त्यावेळी त्यांना एक औषध देण्यात आले होतं आणि त्यामुळे ते ठीकदेखील झाले. आता देवाचे आभार मानायचे सोडून त्यांनी औषधाची चिकित्सा केली. त्यावेळी त्यांना कळलं की, आयोडीन हा घटक खूप महत्त्वाचा आहे. त्यांनी या आयोडीनचा उपयोग करून बेसलीन नावाचं औषध बनवलं. या औषधाचा पहिला महायुद्धामध्ये खूप उपयोग झाला. भिसे यांची आर्थिक बाजू भक्कम झाली. हे बेसलीन बाहेरून लावायचं होतं, पोटात घेण्यासाठी त्याचा उपयोग नव्हता. त्यामुळे यातच पुढं संशोधन करत त्यांनी पोटात घेण्यासारखं टोमिडीन नावाचं औषध बनवलं. रक्तदाब, आतड्याचे आजार, पायरिया, मलेरिया आणि इन्फ्लूएन्झा यांसारख्या अनेक रोगांवर गुणकारी असलेलं हे औषध भारतात सर्वत्र स्वस्तात उपलब्ध व्हावं यासाठी भिसे यांनी भारतीय कंपन्यांनादेखील त्याचा फॉर्म्युला उपलब्ध करून दिला.

१८९६ मध्ये मुंबईमध्ये प्लेगची साथ थैमान घालत असताना भिसे यांनी स्वयंसेवक म्हणून मोलाची कामगिरी केली. प्लेगची लागण झालेल्या रुग्णांनी वेगळं राहाणं अपेक्षित होतं. मात्र भीतीपोटी लोक वेगळे राहायला घाबरत होती. अशा लोकांचे भिसे यांनी प्रबोधन तर केलंच, याशिवाय ब्रिटिश सरकारकडून त्यांच्या पुनर्वसनासाठी जागादेखील मिळवून दिली. प्लेगच्या साथीचं निर्मूलन करण्यासाठी सरकारने एक समिती नेमली होती, तिचे प्रमुख म्हणून भिसे यांना नेमण्यात आलं. त्यांनी या तसंच इतर सामाजिक कामांमध्ये आपल्या पत्नीलादेखील सहभागी करून घेतलं. त्यांची स्त्रीविषयक पुरोगामी भूमिका त्यांनी वेळोवेळी मांडली आहे.

भिसे यांनी लिहिलेल्या डिप्लोमॅटिक दुर्गा या नाटकात बालविवाहाचा प्रश्न मांडला आहे. तसेच घरच्यांनी स्थळ बघून देण्याच्या वृत्तीविरोधात त्यांनी आवाज उठवला आहे. दुर्गा नावाच्या भारतीय मुलीची जॅक या ब्रिटिश पोरासोबत त्यांनी प्रेमकथा रंगवली आहे. एका अर्थाने त्यांनी आंतरधर्मीय लग्नांना पाठिंबा दिला होता म्हणायचा. ते जात, धर्म किंवा प्रांत या सर्वांपलीकडे गेले होते. त्यांनी वैश्विक मंदिराची कमलाकृती संकल्पना करून त्याचं मॉडेल न्यूयॉर्क म्युजियमकडं सादर केलं होतं. यातील कमळ म्हणजे पृथ्वी आणि कमळाच्या सहा पाकळ्या हिंदू, बौद्ध, कॉन्फ्युशियन, ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम यांचं प्रतिनिधित्व करत होत्या. विश्व मानवतेचं हे सूत्र नक्कीच जगासाठी अनुकरणीय असेल.

त्यांना शिकागो विद्यापीठाची सायको-नॅलिसिस या विषयाची डॉक्टरेट तसेच न्यूयॉर्क विद्यापीठाने त्यांना डी.एस.सी. ही पदवी दिली. म्हणजे मॅट्रिक शिक्षण असलेली ही व्यक्ती डबल डॉक्टरेट झाली. त्यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या दिवशी १०० अमेरिकन वैज्ञानिकांच्या उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला. १९३० मध्ये थॉमस अल्वा एडिसनची भेट झाली आणि लहानपणी पाहिलेलं स्वप्न पूर्ण झालं. जागतिक दर्जाच्या 'हू'ज हू' या संदर्भग्रंथात 'भारताचे एडिसन' असं म्हणून डॉ. शंकर आबाजी भिसे यांना गौरवण्यात आलं आहे. ६८ वर्षांचे सफल आयुष्य जगल्यानंतर ७ एप्रिल १९३५ रोजी हृदयक्रिया बंद पडल्याने निधन झालं आणि त्यांची शोधयात्रा थांबली. संशोधन हे व्रत असतं त्याचप्रमाणे संशोधन ही वृत्ती असते. डॉ. शंकर आबाजी भिसे यांनी हे दाखवून दिलं, त्यांच्या अचाट कल्पनाशक्तीला अभ्यासाची आणि चिकित्सक वृत्तीची जोड दिली. त्यामुळे ते एवढे अफाट कार्य करू शकले असे शेकडो संशोधक नव्या पिढीतून यावेत. भिसे यांना मनापासून अभिवादन.

●

# विचारधारा आणि तरुणांची दिशाभूल



**रेश्मा आरोटे ।** मुंबई
मो. ९३२६३५३२८९

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात विचारस्वातंत्र्य ही सर्वात मोठी संपत्ती मानली गेली आहे. प्राचीन काळापासून आपल्या देशात विवेक, सहिष्णुता आणि सर्वसमावेशकतेवर आधारित सामाजिक मूल्यांची परंपरा आहे. या मूल्यांची पायाभरणी संत, महात्मा आणि राजे-रजवाड्यांनी आपल्या विचारांतून आणि कृतीतून केली. छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, तुकडोजी महाराज, गाडगे बाबा यांसारख्या विभूतींनी तरुण पिढीला फक्त देशभक्तीच नाही तर सत्य, नीतिमूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यांचेही भान दिले. शिवाजी महाराजांनी रयतेचं राज्य, धर्मनिरपेक्षतेचे आणि न्यायप्रियतेचे आदर्श उभे केले. त्यांच्या प्रशासनात मुस्लीम सरदारांना मानाचं स्थान होतं. हे दाखवून देतं की, धर्म हा भेदभावाचा विषय नसून, समाज एकत्र ठेवणारी शक्ती असू शकते. त्यांच्या कार्यात प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न होता. त्यांचे कार्य केवळ युद्धनीतीपुरते मर्यादित नव्हते, तर सामाजिक समतेचा संदेश देणारेही होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिबा फुले हे दोघेही विचारवंत, समाजसुधारक आणि देशाच्या मूळ तत्त्वांचा गाभा समजले जातात. फुल्यांनी शिक्षण, विचारस्वातंत्र्य आणि स्त्री-शिक्षणावर भर दिला. त्यांनी जातीय अन्यायाविरूद्ध संघर्ष करत शिक्षणाचा प्रचार केला. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून भारताला केवळ कायदेशीर नाही, तर नैतिकदृष्ट्याही विवेकाधिष्ठित बनवण्याचा प्रयत्न केला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हे त्यांचे घोषवाक्य तरुणांसाठी आजही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांचा विचार आजही प्रत्येक तरुणासाठी दिशादर्शक ठरू शकतो.

**आजचे वास्तव**

आजच्या काळात तरुणपिढी एका विचित्र वळणावर उभी आहे. तिच्या हातात स्मार्टफोन आहे, डोळ्यांसमोर प्रचंड माहिती आहे. पण त्या माहितीचं मूल्यांकन करण्याची बुद्धी मात्र अनेकदा विकसित झालेली दिसत नाही. समाजमाध्यमांवरील अफवा, अपप्रचार, अर्धवट माहिती आणि धार्मिक द्वेषाच्या प्रचारामुळे अनेक तरुण चुकीच्या मार्गावर वळताना दिसतात. तरुण मन उत्साही, बंडखोर आणि नवीन विचारांना खुले असते. हीच ऊर्जा जर योग्य दिशेने वळवली गेली नाही, तर तिचा परिणाम घातक ठरतो. अनेक वेळा तरुणांच्या मनात धार्मिक, सामाजिक किंवा राष्ट्रीय ओळखीबाबत गैरसमज बिंबवले जातात. ही गैरसमजूत हळूहळू द्वेषात परिवर्तित होते आणि त्यातून हिंसेच्या घटना घडतात.

संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या, कुणाल कामरा यांच्या स्टँड-अप कॉमेडी शोच्या ठिकाणी झालेली तोडफोड आणि विचारस्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या नरेंद्र दाभोलकर, एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश यांची हत्या, या साऱ्यांत एक साम्य आहे. हे हल्ले करणारे बऱ्याचदा तरुण असतात. त्यांच्या मानसिकतेवर धार्मिक किंवा राजकीय उन्मादाचा प्रभाव असतो. आध्यात्मिक घोषणा काही घटकांनी धोक्याचा इशारा बनवलेल्या आहेत. पूर्वी भक्तिभावाने उच्चारले जाणारे हे शब्द आज काही जणांच्या तोंडून शत्रूला घाबरवण्यासाठी वापरले जातात. ही घोषणाच जर हत्येचं, मारहाणीचं आणि दहशतीचं कारण बनली, तर आपण कोणत्या धर्माच्या, कोणत्या विचारसरणीच्या नावाने बोलतोय, याचा विचार करायला हवा.

**राजकीय फायद्यासाठी धार्मिक वाद**

आज काही राजकारणी आपल्या स्वार्थासाठी धर्माच्या नावावर तरुणांमध्ये द्वेष पसरवतात. हे राजकारणी स्वतः सुरक्षित व दूर राहातात, पण मैदानात उतरतो तो तरुण. धर्मरक्षक बनण्याच्या नावे हे तरुण दुसऱ्यांवर हल्ले करतात, सामाजिक तेढ निर्माण करतात आणि आपल्या आयुष्याचा अमूल्य काळ हरवून बसतात. या प्रक्रियेत अनेकदा ऐतिहासिक तथ्येही तोडूनमोडून सांगितली जातात. इतिहासाचं राजकारण केलं जातं. व्हायरल व्हिडिओ, अर्धवट माहिती आणि सोशल मीडियावरच्या आक्रमक पोस्ट्स तरुणांच्या

मानसिकतेवर प्रभाव टाकतात. अशावेळी त्यांची विचार करण्याची क्षमता खुंटते आणि ते अंधपणे काही गोष्टींना पाठिंबा देतात. शिक्षणव्यवस्था देखील काहीअंशी अपुरी पडते. केवळ परीक्षाभिमुख अभ्यासक्रम आणि यांत्रिक शिक्षणामुळे तरुणांमध्ये सामाजिक जाणिवा विकसित होत नाहीत. समाजशास्त्र, नागरिकशास्त्र आणि नैतिक शिक्षणावर भर देण्याची गरज आहे, जेणेकरून ते विवेकशील नागरिक म्हणून घडतील.

**विवेक, शंका आणि शाश्वत विचारांची गरज**

ही दिशाभूल थांबवण्यासाठी समाजात एक आरंभ हवा. संवादाचा, विचारविनिमयाचा आणि विवेक जागवण्याचा. तरुणांनी 'का?' असा प्रश्न विचारण्याची सवय लावली पाहिजे. हे खरंच आहे का?, ही माहिती कोणी दिली?, तिचा आधार काय आहे? असे प्रश्न सतत विचारूनच खरा विवेक तयार होतो. दाभोलकर यांनी केवळ विचार दिले नाहीत, तर प्रश्न विचारण्याचं धाडस दिलं. त्यांनी दाखवून दिले की अंधश्रद्धा, जातीयतेविरुद्ध लढणं म्हणजे धर्मद्रोह नाही, तर ते खरे धर्मपालन आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांना या प्रक्रियेत महत्त्वाचं स्थान आहे. तरुणांच्या मनात संविधानाची मूल्यं, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतेचा आदर ही बीजं रुजवणं आज अत्यंत आवश्यक आहे. अभ्यासक्रमात केवळ मार्कांच्या पाठशाळा न ठेवता, नैतिक शिक्षण, चर्चा आणि ऐतिहासिक सत्य समजून घेण्यावर भर द्यायला हवा. याशिवाय पालकांचं मार्गदर्शन, शिक्षकांची जबाबदारी आणि समाजाची एकूण सजगता आवश्यक आहे.

**तरुणाई परिवर्तनाचं साधन असावं, विनाशाचं नव्हे.**

भारताची ओळख ही तरुण देश म्हणून आहे. या तरुणाईकडे जर विवेक, समज आणि सकारात्मकता असेल, तर देशाचा विकास नक्की आहे. छत्रपती शिवाजी महाराज, संतांचे विचार, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आधुनिक पुरोगामी विचारधारा हे सर्व तरुणांना समाजासाठी, देशासाठी आणि मानवतेसाठी प्रेरणा देणारे ठरू शकतात. मात्र हेच विचार जर अंधपणे, निवडक संदर्भांनी वापरले गेले, तर त्याचा उपयोग होण्याऐवजी दुरुपयोगच अधिक होतो. विरोधकांचा आवाज दाबणं ही ताकद नव्हे. त्याला विचारपूर्वक उत्तर देणं ही खरी शक्ती आहे. ही शक्ती तरुणांमध्ये निर्माण होईल तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने प्रगल्भ लोकशाहीत जगू शकतो. अशी लोकशाही जेव्हा तरुणांच्या खांद्यावर उभी राहाते, तेव्हा ती अधिक सशक्त, अधिक विवेकशील आणि अधिक समतावादी बनते. आपल्या विचारांना दिशा देणं, हे आपल्या हातात आहे. विचार करा, शंका घ्या, सत्य शोधा – ही फक्त घोषणा नाही, तर हीच आपली शाश्वत ताकद आहे.

विवेकाचा आवाज बुलंद करूया!!

●

## फरक स्पष्ट करा

**मै ही मै हु**

१) संकल्पना एकट्याची, राबवतो एकटाच.
२) काम करण्याची पद्धती, वेळापत्रक, निर्णय एकटाच घेतो.
३) कामाचे फायदे, तोटे, लाभ एकट्यालाच.
४) संधी एकट्यालाच म्हणून विकासही एकट्याचाच.
५) कामाच्या बाबतीत स्वतःच्या बुद्धी कौशल्याच्या मर्यादा.
६) शकण्याची संधी कमी. चुका दाखवायला कोणीही नाही.
७) एकट्याला निराशा येण्याची शक्यता अधिक.
८) व्यक्ती थांबला की काम ही थांबते.

**हम साथ साथ है**

१) संकल्पना एकट्याची राबविते यंत्रणा किंवा समूह.
२) काम करण्याची पद्धती, वेळापत्रक, निर्णय समूहाने चर्चा करून होतात.
३) कामाचे फायदे, तोटे, लाभ सामूहिक.
४) सामूहिक संधी म्हणून सामूहिक विकास.
५) सामूहिक प्रयत्नातून बुद्धी आणि कौशल्याच्या मर्यादांवर मात करता येते.
६) समूहात शिकण्याची संधी अधिक. चुकांची चर्चा करायला वाव, सुधारण्याला संधी.
७) समूहात निराशा येण्याची शक्यता कमी. एकमेकांना प्रेरणा देत उत्साह टिकण्याच्या शक्यता अधिक.
८) समूहात जबाबदारीचे वाटप असल्याने काम थांबण्याची शक्यता जवळपास नाहीच.



# संघर्षातून विवेकाची वाटचाल

**विनया सुशिला** । डोंबिवली
मो. ८६५२४३१८३९

मी विनया, महाराष्ट्र अंनिसच्या डोंबिवली शाखेची विवेकाचा वारसा पुढे घेऊन जाणारी कार्यकर्ती. आज या विवेकाच्या वाटेवर मार्गक्रमण करीत असताना इथपर्यंत येणे किती अवघड होते, याची जाणीव मला आधीच्या दिवसांकडे वळून पाहाते तेव्हा होते. अंधश्रद्धा रूजण्यास आणि त्या भक्कम होण्यास ते दिवस आणि त्यावेळची आमची स्थिती पोषक अशीच होती.

वडिलांचा आधार चार महिन्यांची असल्यापासून सुटला आणि आई अपंग. अशा असहाय्य स्थितीत, मला जगायला, हट्ट पुरवून घ्यायला, मन मोकळे करायला, प्रेम करायला, हक्क गाजवायला मानसिक आणि भावनिक आधार फक्त एकच होता आणि आजही आहे. तो आधार म्हणजे ८९ टक्के अपंग असलेली माझी आई. माझ्या जन्मानंतर आईला तिच्या व माझ्या सर्व जबाबदाऱ्या एकटीला पूर्ण करणे शक्य नसल्यामुळे वर्ष-दीड वर्षात, कोणत्याही नातेवाईकावर ओझं होऊ नये म्हणून, माझी सोय दर महिन्याला फी भरून एका आश्रमात केली. त्याच संस्थेच्या दुसऱ्या शाखेत आईची तिच्या शिक्षणामुळे राहाण्याची आणि नोकरीची सोय झाली. आम्हाला एकमेकींना भेटायला महिन्यातून एकदा सोय होती. आश्रमातून मी दिवाळीला दहा दिवस व मे महिन्यात महिनाभर आईकडे सुट्टीसाठी येत असे. आमची ही अशी ताटातूट बारा वर्षे चालली. या दिवसात आई मला वाचन-लिखाणासाठी प्रोत्साहन द्यायची. मला जमेल तसे फिरायला घेऊन जायची. चांगल्या दर्जाचे एक-दोन सिनेमे व नाटके दाखवायला घेऊन जायची. तसेच आमची होणारी ताटातूट समजून घेऊन मानसिक, भावनिक आधार द्यायची. दरवर्षी आई मला आश्वासन द्यायची की लवकरात लवकर स्वतःचे घर घेऊन आपण एकत्र राहू. या आशेवर मी राहिले. आई तिच्या परीने अथक प्रयत्न करत राहिली. याची जाणीव तिने मला




कधीच होऊ दिली नाही. परिस्थितीत फारशी सुधारणा होत नसल्यामुळे दरवर्षी, पुढील वर्षी तरी बाहेर पडून आईबरोबर राहता येईल, या आशेवर आश्रमात जावे लागे.

आईला माझ्यासाठी स्वतःच्या आयुष्यातही ज्या अनेक तडजोडी कराव्या लागल्या याची तर मी कल्पनाही करू शकत नाही. त्या काळात तिच्यापासून वेगळे राहावे लागत आहे, यापेक्षा काही खूप सुख-दुःख कळतच नव्हते. आश्रमात अनेक मुला-मुलींना आई-वडील नव्हते. ते अनाथ जीवन जगत होते. मलाही खूप वेळा भीती वाटत असायची की मी परत आईला भेटू शकेल की नाही. मी सुद्धा इथे अशीच कायमची राहिली तर? त्यावेळेस खूप एकटे वाटायचे. आजही ते दिवस आठवले तर मन भरून येते. पण त्यावेळची तीव्रता कमी झाली आणि सावरली आहे.

महिला अंधश्रद्धेच्या वाहक असतात असे म्हटले जाते. अशा कठीण परिस्थितीत तर महिला अंधश्रद्धेला हमखास बळी पडतात. आई आधीपासून धार्मिक रीतिरिवाज, प्रथा या बाबीत सामाजिक भीतीमुळे, दडपणामुळे अडकून पडलेली होती. त्यातूनही ती जगण्याचा मार्ग काढत राहिली. मी बारा वर्षांनी आश्रमातून बाहेर पडल्यावर आम्ही दोघींनी सर्व जबाबदाऱ्या सांभाळल्या. आईने नोकरी करत असताना मेहनत करून तिचे बी.ए., बी. कॉम. चे शिक्षण पूर्ण केले. तिला एम. ए. ही पदवी देखील मिळवायची होती. परंतु तिच्यावरील माझ्या जबाबदारीमुळे ते शक्य झाले नाही. तरीही माझे एम. ए. पर्यंतचे शिक्षण मात्र परवडत नसतानाही तिने पूर्ण करून घेतले. मी देखील बारावीनंतर एम.ए. पर्यंतचे शिक्षण मन लावून पूर्ण केले. आईने शिकवण्या घेऊन घर चालवले. मी देखील नोकरी करून घराला व माझ्या शिक्षणाला, कमवा आणि शिका, या पद्धतीने हातभार लावला. जॉब करून घराला हातभार

लावता यावा म्हणून दहावीपासूनचे पुढचे सर्व शिक्षण बाहेरून फॉर्म भरून पूर्ण केले. नोकरीचे वय नसल्यामुळे काम मी करायचे; पण पगाराचा चेक आईच्या नावावर यायचा. आई सर्व खर्चातून बचत करत राहायची व छोटा का होईना, परवडेल असा, दागिना बनवून घ्यायची. मला त्या वेळेला या गोष्टींची किंमत कळत नव्हती. पण आज घर घेताना, त्यावेळेला आईने केलेल्या तडजोडीची किंमत कळली आणि खूप भारी वाटले. आजच्या घडीला आम्ही दोघी कष्ट आणि संघर्ष करून स्वतःच्या हक्काच्या घरात राहातोय. मी स्वतः सुद्धा शिक्षण पूर्ण करून नोकरी करत आहे. हे सर्व आईच्या त्यावेळच्या हुशारीमुळे, सावधगिरीमुळे आणि बचत करण्याच्या सवयीमुळे शक्य झाले. या सर्व प्रवासात वेळोवेळी आपली म्हणावी अशी कितीतरी माणसं सोबत जोडली गेली आणि आधार होत गेली आणि कठीण प्रसंगावर मात करत पुढे जाणे शक्य झाले. उदा. अगदी अडचणीच्यावेळी मदत करणाऱ्या रमा देशपांडे, शिक्षणात प्रोत्साहन देणाऱ्या सुनीता भगवते मॅडम, ऑफिसमधील मानसिक आणि भावनिक आधार देणाऱ्या अंबुजा मॅडम.

अशी एकंदरीत निराशाजनक स्थिती असताना, मी महाराष्ट्र अंनिसच्या संपर्कात आले. त्यानंतर आजपर्यंतच्या प्रगती आणि विवेकाच्या वाटेवरील सफरीत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या डोंबिवली शाखेतील कार्यकर्त्यांचा खूप मोठा वाटा आहे. डोंबिवली शाखेच्या सुरेखा भापकर, किशोरी गरुड, अशोक अहिरे सर, निशिकांत विचारे, मुकुंद देसाई, गुलाब सूर्यवंशी, परेश काठे या सर्वांनी आमच्या संघर्षाच्या काळात जातीने लक्ष घालून, वेळात वेळ काढून, आईचे आजारपण व इतर अडचणीच्यावेळी स्वतः हजर राहून आणि धावपळ करून मदत केली. महाराष्ट्र अंनिस ही केवळ एक विवेकी समाज घडवणारी संघटना नसून एक कुटुंब आहे याची जाणीव आम्हाला झाली. त्यामुळे आमचा प्रवास सुखकर झाला. आमची म्हणावी अशी माणसं इथूनच जोडली गेली. प्रेम आणि आधार मिळत गेला.

महा. अंनिससोबतच्या प्रवासात मैलाचा दगड ठरलेल्या पनवेल शाखेद्वारा आयोजित ‘झेप’ शिबिराचा उल्लेख आवर्जून करावाच लागेल. या एका कार्यक्रमामुळे माझा आत्मविश्वास वाढला आणि जगण्याकडे बघण्याचा असलेला नाराजीचा सूर बदलला. मोकळेपणाने सर्वांबरोबर मनापासून संवाद साधू शकले. यात आरती आणि महेंद्र नाईक यांचा खूप मोठा वाटा आहे. ‘झेप’ या शिबिरामुळे माझ्या जगण्याची दिशाच बदलली आणि जगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.

आई आधी धार्मिक आणि जुन्या प्रथा-परंपरांच्या बाबीत सामाजिक दबावात असताना मला या बाबतीतल्या माझ्याच अज्ञानामुळे तिला स्पष्ट विरोध करणे किंवा योग्य-अयोग्य मांडणी करणे जमत नव्हते. पण जेव्हापासून महाराष्ट्र अंनिसमध्ये आम्ही स्वतःला जोडून घेतले तेव्हा कळत गेले की, अंधश्रद्धांच्या भ्रमात राहाण्यापेक्षा डोळसपणे वास्तव स्वीकारावे, मग आयुष्याचा प्रवास कितीही खडतर किंवा संघर्षमय असो. त्यामुळे, निदान पुढे जाऊन आयुष्याची राखरांगोळी होण्यापासून तरी स्वतःला वाचवू शकतो. चुकीचे असले तरी केवळ बहुसंख्य लोकांना, समाजाला पटते, म्हणून आपणही अंधश्रद्धांच्या मागे धावून, त्यासाठी लागणारा वेळ, पैसा, खर्च करून, होणारी मानसिक, भावनिक, आर्थिक फसवणूक करून घेण्यापेक्षा वेगळी विवेकाधारित स्वतंत्र अशी वाट चोखाळून स्वतःचे आयुष्य घडवू शकतो हे महाराष्ट्र अंनिसने मला शिकवले. महाराष्ट्र अंनिसमध्ये आल्यापासून आमच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. शारीरिक, भावनिक आणि बौद्धिक ताकद योग्य दिशेला वापरत गेलो. डॉ. नरेंद्र दाभोलकर सरांची पुस्तके वाचली आणि यू-ट्यूबवरील मुलाखती, भाषणे ऐकली. शाखेच्या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर विचारमंथन व्हायचे. त्यामुळे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील फरक स्पष्ट कळायला लागला. वैज्ञानिक दृष्टिकोन कळला. विचारांना योग्य दिशा लाभली. विज्ञान, निर्भयता आणि नीती म्हणजे काय ते कळले. जीवनात अजूनही चढउतार, संकटे येतात आणि तो जीवनाचा भाग आहे. परंतु महा. अंनिस सोबत असल्याने ‘संकटे दाही दिशा, जडली झुंजायाची नशा...’ असे स्पिरिट घेऊन जगत आहे.

महाराष्ट्र अंनिसमध्ये आल्यानंतरचे आयुष्य म्हणजे ‘फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश, दरी खोऱ्यातून वाहे एक प्रकाश प्रकाश’ असे होऊन गेले आहे. कुणावर विसंबून न राहाता स्वतःसाठी व इतरांसाठीही आधार देऊ शकतो, असा आत्मविश्वास येत गेला. यापुढील प्रवासदेखील महाराष्ट्र अंनिससोबत विवेकाच्या वाटेने होत राहाणार हा आनंद सोबत राहाणारच आहे.


●



# दास्तान

**प्रा. शाम जोगळेकर ।** अलिबाग (रायगड)
मो. ९२७३३४३१७७

'दास्तान' ही डॉ. प्रतिमा इंगोले यांची कादंबरी मायबोली अध्ययन अंतर्गत सोनल प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केली आहे. सुरुवातीला लेखिकेचे सविस्तर 'मनोगत' वाचावयास मिळते. ही कथा एका गावाची कहाणी असली, तरी ती आपल्या देशाचीही प्रातिनिधिक कहाणी आहे. हिंदू-मुसलमान संघर्ष कमीजास्त प्रमाणात गावोगावी असतो. मात्र काही आदर्श गावांत हिंदू-मुसलमानांचे देव एक असतात. या गावातील मियाँबाबाला हिंदू-मुसलमान नवस करीत होते. परंतु आता हे दिसत नाही. संघर्ष पेटता राहातो. कारण राजकारणी मंडळींना हा सलोखा नको असतो. या कादंबरीतील शंकर हा स्वार्थ न पाहाता गावाचे भले पाहातो. त्याला खरे परिवर्तन हवे असते. या कहाणीला सत्याचा आधार आहे. ही कादंबरी वाचून समाजाने काही बोध घ्यावा, शिकावे, अशी अपेक्षा लेखिकेने व्यक्त केली आहे. 'दास्तान' या फारसी शब्दाचा अर्थ कहाणी अथवा विस्तृत माहिती. १९२० ते १९३०च्या दशकातील ही कहाणी असावी. मात्र हा प्राथमिक इतिहास विस्मृतीत गेला आहे. पुण्याच्या मनोज संत यांचे रंगीत मुखपृष्ठ या पुस्तकाकडे वाचकाला आकृष्ट करते. ही कादंबरी छोट्या-मोठ्या बत्तीस प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते आहे.




सातपुड्याच्या छायेत वसलेले बावऱ्या गाव हे पुरातन होते. द्वारका बुडाली तेव्हा दुफळी माजल्याने यादव पांगले. बहुतेक विदर्भात आले. पूर्वी हा गाव गवळ्यांचा गाव म्हणून प्रसिद्ध होता. तटबंदी असलेल्या या गावाला उत्तर-दक्षिणेला महाद्वार होते. कालांतराने गवळ्यांची वस्ती नष्ट झाली. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुस्लिमांचे आक्रमण झाले. त्यावेळी गावातले महादेवाचे मंदिर गायब झाले. गावातील दोन विभागात मराठे आणि अन्य विविध जातींचे लोक राहात होते. गावाला गढीविषयी आदर होता. नदीच्या पूरकाळात सर्वसामान्य लोक गढीच्या आश्रयास येत असत. गावात तिळाचं पीक मोठ्या प्रमाणात काढले जाई. 'घाणीचे गाव' म्हणूनही हे गाव प्रसिद्ध होते. गढीवरील तीन भाऊ आणि त्यांच्या परिवाराविषयी गावाला आदर वाटत असे. गाव पांडुरंगाचे भक्त होते. त्यामुळे गावात कोणी जातिभेद पाळत नव्हते. मनाजी पाटील दरवर्षी वारीवरून आले की, गावात जणू जत्रा भरत असे. त्यावेळच्या गावजेवणात हिंदू-मुसलमान सामील होत असत. त्यावेळी विविध नवसही बोलले जात.

गावातील दोन विभागांत विविध जातींचे लोक राहात होते. ते सर्व गढीचा सन्मान जपत असत. बलुतेदारीमुळे सर्व आपापली कामे करून मोबदला वस्तुरूपात प्राप्त करत होते. गढीवरील मनाजी पाटील यांच्याविषयी सर्व हिंदू-मुसलमान गावकऱ्यांना अतीव आदर होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील नोंदणीबुकात गावाचे वर्णन होते. फार पूर्वी मुसलमान आल्यावर गावातील शंकराचे देऊळ गायब झाले होते. गावात मस्तानशहा मियाँचा दर्गा होता. मियाँबाबाचे हिंदू आणि मुसलमान शिष्य होते. दर्गा म्हणजेच महादेवाचे देऊळ होते, असे हिंदू दबक्या आवाजात बोलत होते. गावचा इतिहास आगळावेगळा होता. हिंदू-मुसलमान गुण्यागोविंदाने राहात होते.

कालांतराने गावात एक विपरीत घडले होते. एका शेतात पाच खून झाले होते. त्या काळातील इंग्रज सरकारच्या पोलिसांनी संशयावरून गढीवरील सर्व

पुरुषांना पकडून नेले आणि त्यांना कैदेत टाकले होते. त्यांच्यावर गुन्हा कबूल करण्यासाठी जबरदस्ती, बळजबरी केल्याचे कळल्याने गावकरी अस्वस्थ झाले. गढीतील मास्तरने सर्व प्रयत्न केले. मोठ्या रकमेची व्यवस्था विविध मार्गांनी कोर्ट खर्चासाठी करावी लागते. शेवटी गढीवरील बुढीबायची साक्ष महत्त्वाची ठरून, खरे खुनी पकडले जातात. गढीवरील सर्व तुरुंगातील, निर्दोष सुटतात. मनाजी पाटलांचा धाकटा लेक मास्तर झाला होता. त्याच्या प्रयत्नांतून आणि गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे गावात एकाच जागी ज्ञानमंदिर, मस्जीद, महादेवाचे मंदिर निर्माण होते. विशेष म्हणजे मस्जिदीवरील पूर्वीचा भंगलेला दगडी कळस काढून, नवीन बसविला गेला. अशा गावाचे कौतुक, कालांतराने उद्‌घाटनप्रसंगी शिक्षणमंत्री मुक्तकंठाने करतात.

'दास्तान' ही कादंबरी वाचनीय झाली आहे. त्यामधील विषय आणि मांडणी वेगळ्या प्रकारची आहे. कादंबरीतील ग्रामीण भागातील बोलीभाषा सध्याच्या अकोला जिल्ह्यातील आहे. कादंबरीतील प्रमुख पात्रे वाचकाच्या मनी दीर्घकाळ रेंगाळतील. त्याकाळची बोलीभाषा, प्रथा आणि चालीरिती समजणे काहीसे अवघड होते. त्यामुळे बोलीभाषेतील शब्दांचे, प्रमाणभाषेतील अर्थ देण्याची गरज सामान्य वाचकाला जाणवते. पुढे काय होते, ही उत्सुकता वाचकाला कादंबरी पूर्ण वाचण्यास प्रवृत्त करते. कोणत्याही परिस्थितीत गावातील एकोपा कायम राखणे, ही सर्व गावकऱ्यांची जबाबदारी असल्याची जाणीव ही कादंबरी वाचून वाचकाला निश्चितपणे होते. आजच्या काळातही ही कादंबरी वाचकाचे उत्तम प्रबोधन करते आहे. हेच 'दास्तान' कादंबरीचे यश आहे!

**पुस्तकाचे नाव :** दास्तान
**लेखिका :** डॉ. प्रतिमा इंगोले.(९८५०११७९६९)
**प्रकाशक :** सोनल प्रकाशन (दर्यापूर, जि.अमरावती)
**पृष्ठे :** १६०  **मूल्य :** रु.२००/-

•

## भावपूर्ण आदरांजली

विज्ञान शिक्षण, संशोधन, साहित्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन कार्याच्या क्षेत्रात आपल्या कृतिशील कार्याचा ठसा उमटवणारे जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर हे विवेकी विचारसरणीचे सर्वोच्च मानबिंदू होते. त्यांच्या जाण्याने वैज्ञानिक क्षेत्रात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. खगोलीय विज्ञान, ग्रह, तारे, नक्षत्र यांचे मानवी मनावर होणाऱ्या परिणामाबाबत ज्योतिषी सांगायचे त्यांना आणि सुशिक्षित लोक ज्योतिषावर विश्वास ठेवतात त्यांना डॉ . नारळीकरांनी सतत परखडपणे खडे बोल सुनावले आहेत.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ते आधारवड होते. आयुकाच्या माध्यमातून महा. अंनिसला त्यांनी फिरते नभांगण उपलब्ध करून दिल्याने राज्यभरातील शाळा महाविद्यालयातून 'विज्ञान बोध वाहिनी आपल्या भेटीला' हा उपक्रम लाखो विद्यार्थी आणि शाळांच्यापर्यंत पोहचवता आला. महा. अंनिसच्या कामाशी त्यांची अधिक जवळीक होती. संघटनेच्या पंचवीस वर्षपूर्तीच्या कार्यक्रमाला त्यांना खास निमंत्रित करण्यात आले होते. पण प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणामुळे मी यावेळी येवू शकणार नाही असा निरोप त्यांनी पाठवला होता. पण त्यांना राहवले नाही त्यांनी नंतर मी येत आहे असे सांगून व्याख्यान देऊन गेले. त्यांची अनेक पुस्तके आहेत. 'आकाशाशी जडले नाते' हे पुस्तक प्रत्येकाने वाचण्याचा संकल्प करून त्यांना खरी कृतिशील आदरांजली वाहता येईल. माझ्या व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन परिवारातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या वतीने आदरणीय जयंत नारळीकर सरांना भावपूर्ण आदरांजली.

**माधव बावगे**
राज्य कार्याध्यक्ष
महा. अंनिस

# भंगार गोळा करणारी म्हातारी...



**प्रा. एकनाथ पाटील** । इस्लामपूर (सांगली)
मो. ९४२११२८५०८२

ऐन कडाक्याच्या थंडी
आणि पहाटेच्या अंधारातच
भंगार गोळा करायला
नियमित बाहेर पडते म्हातारी..
डोक्याला झोळणा अडकवून
आलटूनपालटून शहराच्या वेगवेगळ्या भागात
भंगाराच्या शोधात ती फिरत असते
हाताला लागेल ते जमा करीत...

पहाटे मॉर्निंग वॉकला बाहेर पडल्यावर
तीनचार दिवसाच्या अंतराने
हमखास दिसते ती वारंवार.
विटकरी रंगाचे जुनाट लुगडे
एका पायात फाटका बुट
आणि दुसऱ्या पायात झिजलेली स्लिपर
थंडीपासून संरक्षणासाठी स्वेटर नसते अंगावर
आणि बांधलेले नसतात कान.
कान बांधायला कुठून आणावा तिने स्कार्प?
कमरेतून वाकली आहे बिचारी
नीट उभीही राहू शकत नाही...
कसल्याकसल्या शारीरिक व्याधी जडल्या असाव्यात तिला
तरीही डोक्याला झोळणा अडकवून
कुडकुडत भटकत असते एकटी.
समुद्रात शोधावे दुर्मिळ मोती,
तसं जगण्याच्या पसाऱ्यात
भंगार शोधत फिरते ती शहरभर...
तिला कुठे माहीत आहे,
नेमके कुठे आणि काय बनवले जाते
या भंगारापासून टिकाऊ?

माहीत नाही,
शहराच्या कुठल्या भागात आहे तिची झोपडी?
तिथं ती कोणाकोणासोबत राहाते?
पहाटे किती वाजता उठते?
अंघोळ करीत असेल काय?
आणि करीत असेल,
तर इतक्या पहाटे तिला कोण तापवून देत असेल पाणी?
आलिबाबाच्या गुहेसारखा डोक्याचा झोळणा
कुठे रिकामा करीत असेल?
आणि दिवसाकाठी तिला नेमकी किती रक्कम मिळत असेल?
मिळालेली रक्कम योग्य तरी असेल का?
आणि ही रक्कम तिला मोजता तरी येते का?

नजर अधू झाली आहे वयानुरुप
चष्मा लागलाच असेल,
पण तो घ्यायला पैसे नसतील तिच्याजवळ...
तरीही भंगार शोधण्याची दिव्यदृष्टी मात्र आहे तिच्याकडे.
भंगार गोळा करताना,
कुणाच्या मालकी वस्तुला ती कधीही लावत नाही हात
आणि त्यातूनही कुणी काही अद्वातद्वा बोललंच,
तर ते फारसं मनाला लावून घेत नाही...

माझ्या आईच्याच वयाची असेल,
तरीही या वयात तिला असे फिरावे लागते रस्तोरस्ती
'म्हातारपणाची काठी' म्हणून मुलगा नसेल का पोटी?
की सुनेनं घरातून हाकलून दिलं असेल उपाशी?
कुणासाठी ती गोळा करीत असेल भंगार?
तिचा नातू नगरपालिकेच्या जुनाट शाळेत शिकत असेल
आणि वह्या पुस्तकांसाठी घरात तो बापाशी भांडत असेल,
मग त्याच्या शिक्षणाची काळजी असेल का तिला?
की, बिनलग्नाची असेल घरी नात
आणि तिच्या लग्नासाठी तिला जमा करायची असेल पुंजी
की, भुईला धरुन एकटीच राहात असेल
आणि आपल्याच म्हातारपणाची ती सोय करीत असेल?
या भंगारावर अशी किती अवलंबून असतील तिची स्वप्नं ?

काही विचारलेच खोदून
तर प्रतिसाद देत नाही ती अजिबात.
आतूनबाहेरून तिने घट्ट बंद करून घेतले आहे मनाचे दार
आपल्या जगण्याच्या कोषात
कटाक्षाने इतरांना प्रवेश नाकारते...
आणि कळत नाही,
माणूस भंगारात निघण्याच्या या कठीणकाळात
भंगारात ती नेमकं कसलं भविष्य शोधते?




# सोच

**पुजा पुहाल** । नांदेड
मो. ७४९९०२५१२६

'ना थके कभी पैर, ना हिंमत हारी है ।
जज्बा है जिंदगी में परिवर्तन का
इसलिये सफर जारी है।'

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती युवा सहभाग विभाग आयोजित दुसरी युवा छावणी "The SOCH 2025" दि. ९ ते ११ मे, २०२५ रोजी राजगुरुनगर (पुणे) येथील 'मैत्री हिल्स' या निसर्गरम्य ठिकाणी यशस्वीरीत्या पार पडली. संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ११० शिबिरार्थी या छावणीत सहभागी झाले होते. या छावणीत शिबिरार्थींचे एकूण ७ गट पाडण्यात आले होते. हे गट, गटबाजी करणारे नव्हते तर राष्ट्रीय एकात्मता जपणारे व संविधानिक मूल्य दर्शवणारे होते. गटाची नावे होती, स्वातंत्र्य गट, समता गट, बंधुता गट, न्याय गट, धर्मनिरपेक्षता गट, सार्वभौमत्व गट आणि एकात्मता गट. या गटांनी प्रत्येक सत्राच्या आधी चळवळीचे गाणे गाऊन वातावरण ऊर्जादायी ठेवले होते. छावणीचे उद्घाटन प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन करताना शिबिरार्थींनी 'आपल्या मनातील भारत' या थीमला अनुसरून आपल्या आसपासच्या निसर्गातील वस्तूंमधून प्रतिकृती साकारल्या व त्यांच्या मनातील भारत कसा आहे याची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली. या उद्घाटन सत्रात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, युवा विभागाच्या राज्य कार्यवाह प्रियंका खेडेकर आणि मैत्री हिल्सचे सर्वेसर्वा डॉ. कटारिया हे देखील विचारमंचावर उपस्थित होते. अरविंद जगताप सरांनी तरुणांना उद्देशून बोलताना आपण कॅमेराद्वारे सोशल मीडियावर वस्तूंची सुंदर चित्रे टाकू शकतो; परंतु त्याचा सुगंध, त्याचा स्पर्श आपण त्या वस्तूंना स्पर्श केल्याशिवाय, त्यांच्या सहवासात राहिल्याशिवाय जाणवू शकत नाही. त्यामुळे तरुणांनी सोशल मीडियाच्या पूर्णतः आहारी न जाता कॅमेरा बाजूला सारून निसर्गात व जीवनातही मनापासून रममाण व्हावे असा संदेश देत समर्पित भावनेने काम करणे किती गरजेचे आहे, हे विविध उदाहरण देत पटवून दिले. तसेच विचारी युवा पिढी घडणे देशाच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे, असे मतही त्यांनी मांडले. यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणात माधव बावगे म्हणाले, समाजात कितीही अनागोंदी माजलेली असली तरीही अशा काळात समाज झोपलेला असताना युवकांनी ड्रायव्हरची भूमिका बजावून समाजाला पुढे नेले पाहिजे.



या शिबिरात एकूण ९ सत्र झाले. 'संविधानाची तोंडओळख' या सत्रामध्ये संविधान संवादक राजवैभवने संविधानातील विविध मूल्ये अतिशय साध्या सोप्या भाषेत आणि खेळीमेळीच्या वातावरणात समजावून सांगितली. यामुळे संविधान हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे हे समजले. यावेळेस अनेक शिबिरार्थी भावनिकही झाले होते. यानंतर विवेकी व्यक्तिमत्त्व विकास हे सत्र घेताना विनायक सावळे यांनी त्यांच्या खुमासदार अभिनयाने मानवी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजावून सांगत त्यांच्याशी संवाद साधला. रात्री जेवणानंतर 'खगोलविज्ञान व फलज्योतिष' या

विषयावर डॉ. नितीन शिंदे यांनी सत्र घेतले. त्यांनी या सत्रात कुंडली/पत्रिका, त्यातील राशी, नक्षत्र, वास्तुशास्त्र हे किती खोट्या लॉजिकद्वारे वापरले जाते हे समजावून सांगत या सर्व गोष्टी खोट्या ज्ञानावर उभारलेल्या आहेत हे पटवून दिले. त्यांची बोलण्याची व गोष्टी सादर करण्याची शैली सर्वांना खिळवून टाकणारी होती. यानंतर शिबिराच्या दुसऱ्या दिवशी 'लिंग समभाव व लैंगिकता' या विषयावर मिलिंद चव्हाण यांनी संवाद साधला. त्यांनी शिबिरार्थींना वाचण्यासाठी विविध केस स्टडीज देऊन त्याद्वारे समाजव्यवस्थेत डोकावण्यास प्रवृत्त केले. स्त्रियांचे घरात विनामोबदला काम करणे व या मागचे अर्थकारण, समाजव्यवस्थेत रुजलेला लिंगभाव व यावर मात करण्यासाठी आवश्यक असलेला लिंगसमभाव या सर्व संकल्पना स्पष्ट करून सांगितल्या. यापुढील 'दिल, दोस्ती, दुनियादारी' हे सत्र आरती नाईक यांनी घेतले. त्यांनी Relationship, Break up, Love at First Site या गोष्टींना हात घालत प्रेम व आकर्षण यातील फरक, प्रपोजला कसे हाताळावे, प्रेमात असताना कोणत्या बाबींविषयी सतर्क राहावे, नकार देताना व पचवताना कोणती काळजी घ्यावी या बाबी समजावून सांगत, एकतर्फी प्रेमातून होणारी हिंसा, डिशऑनर किलिंग, बलात्कार यावरही भाष्य केले.



यानंतर 'मानसिक आरोग्य व युवा' हे सत्र डॉ. अनिल डोंगरे यांनी घेतले. करियर, अपयश आणि टेन्शन या विषयांवर त्यांनी भाष्य केले. त्यांनी करिअरच्या वेगवेगळ्या वाटांची माहिती दिली. तसेच तुमचा इंटरेस्ट कशात आहेत, हे धुंडाळताना, निवडलेल्या क्षेत्रात किती संधी आहे हेही जाणून घेणे आवश्यक आहे, ही बाब त्यांनी उपस्थितांना लक्षात आणून दिली. त्यानंतर व्यसन व व्यसनांचे टप्पे यावरही त्यांनी भाष्य केले. यानंतर मुक्ता चैतन्य यांनी 'सोशल मीडियाचा विवेकी वापर' या विषयावर सत्र घेताना डिजिटल फूट प्रिंट व डिजिटल प्रोफाइल म्हणजे काय व याद्वारे सोशल मीडिया आपल्यावर कशाप्रकारे नजर ठेवते, Algorithm हा आपल्या माहितीचे कशाप्रकारे विश्लेषण करून आपल्या इच्छा व कृतीशी निगडित पोस्ट व जाहिरात आपल्याला सोशल मीडियावर पुरवते या सर्व बाबी समजावून सांगितल्या. सोशल मीडियाचे व्यसन लागू नये म्हणून आपण जागृत राहिले पाहिजे, सोशल मीडियावरील आपला पर्सनल डाटा आपल्या नियंत्रणात राहायला हवा, सोशल मीडियावर फेक माहितीही असू शकते. त्यामुळे अशी माहिती पडताळून पाहिल्याशिवाय पुढे फॉरवर्ड करू नये, या बाबीही त्यांनी समजावून सांगितल्या. तसेच समाजात अराजकता पसरवण्यासाठी समाजकंटकांकडून सोशल मीडियाचा होणारा वापर, सायबर हल्ले व सायबर वॉर, Trolling, सोशल मीडियाच्या Dating App द्वारे होणारे लैंगिक छळ व Matrimonial Frauds, सोशल मीडियावरून आर्थिक फसवेगिरीही होऊ शकते याविषयीची माहितीही त्यांनी दिली. या सर्व बाबीमुळे आपण सोशल मीडियाचा वापर जपून केला पाहिजे, असे त्यांनी सर्वांना सांगितले. दिवसाच्या शेवटी सर्व गटांनी त्यांना दिलेल्या सामाजिक विषयावर कलाविष्कार सादर केला, ज्यात अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणाचे भांडवलीकरण, लोकशाही, लैंगिक शिक्षण, आरक्षण, प्रतीकांची अस्मिता, लैंगिक शिक्षण यांसारखे विषय समाविष्ट होते.

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी मिलिंद चव्हाण सरांनी 'धार्मिक सलोखा' या विषयावर सत्र घेतले. यात त्यांनी प्रथम शिबिरार्थींकडून त्यांचे धर्माविषयीचे विचार जाणून घेतले. यानंतर दंगली कशा घडवल्या जातात हे त्यांनी स्पष्ट करून सांगितले. आंतरराष्ट्रीय सीमावाद आपण कशाप्रकारे हाताळतो आणि महाराष्ट्र-कर्नाटकसारखे देशांतर्गत सीमावाद आपण कशाप्रकारे हाताळतो हे

सांगतानाच सध्याच्या काळात जैविक अस्त्र व अण्वस्त्र अस्तित्वात असल्यामुळे दोन्ही देशातील निष्पाप जनता मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडू शकते, त्यामुळे युद्धाची भाषा न करता संवादाची भाषा वापरत प्रश्न सोडवण्यावर भर द्यावा. तसेच युद्धापेक्षा अन्न, रोजगार, शिक्षण, आरोग्य या मूलभूत प्रश्नांकडे जास्त लक्ष द्यायला हवे असे म्हणतानाच, धार्मिक मुद्द्यांवर तरुणांची माथी न भडकवता, त्यांची ऊर्जा संविधानिक मूल्यांवर भर देणाऱ्या सकारात्मक कामासाठी कशी वापरता येईल यावर लक्ष द्यायला हवे असे मत मांडले. त्यानंतरच्या सत्रात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची ओळख सांगताना अंधश्रद्धेचे समाजावर कोणते दुष्परिणाम होतात, समाजात अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज का आहे, याविषयी माहिती देत श्रद्धेवर विश्वास ठेवताना त्या श्रद्धेला पुष्टी देणारा पुरावाही आपण शोधला पाहिजे हे कृष्णात सरांनी विविध उदाहरणं देत शिबिरार्थींना पटवून सांगितले. अंधश्रद्धा निर्मूलन करणे म्हणजे लोकांना मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढणे असून अंधश्रद्धा निर्मूलन समितीची 'पंचसूत्री' त्यांनी समजावून सांगितली. तसेच  वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्वही त्यांनी सांगितले. हे सांगतानाच अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आतापर्यंत राबवलेले उपक्रम व यातील काही उपक्रमांना महाराष्ट्र शासनाची मिळालेली मान्यता व त्यानुसार त्यांनी केलेले कायदे; तसेच याव्यतिरिक्तही अंधश्रद्धा निर्मूलन समिती इतर कोणकोणत्या विषयावर काम करते, याची माहितीही कृष्णात यांनी दिली व सर्व शिबिरार्थींना अंनिसशी जोडून घेण्याचे आवाहन केले.

समारोप सत्रात लेखिका हिना कौसर खान यांनी महिला शेतकऱ्यांच्या नावावर शेतजमिनी नसणे, संघटन शक्तीची प्रभावी परिणामकारकता, देशातील प्रादेशिक संस्कृतीची विविधता आणि धार्मिक सलोखा याविषयी माहिती देतानाच नेहमी आक्रमक बोलणे प्रभावी असतेच असे नाही, तर शांत व संयमी बोलूनही आपले मुद्दे लोकांपर्यंत पोहोचवता येतात, असे मत त्यांनी मांडले. एकंदरीत प्रत्येक सत्राच्याआधी शिबिरार्थींनी चळवळींची गाणी गाऊन दुमदुमून टाकलेले शिबिराचे वातावरण, प्रत्येक सत्रानंतर वक्त्यांसोबत झालेला प्रश्नोत्तराचा तास आणि त्यातून मिळणारी उत्तरे या सर्व गोष्टी हे शिबिर सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता निर्माण करणारे व समाजकार्यात आपला कृतिशील वाटा देणारे तरुण घडवील, याचे आश्वासन देणारे होते.

●






# अंधश्रद्धेची अजब पद्धत

**ताडगाव** (जि. रायगड) येथील एका विहिरीमध्ये विष टाकल्याचा संशय दि. ११ एप्रिल, २०२५ रोजी निर्माण झाला होता. या घटनेने परिसरात काही काळ तणाव व संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, मुलीचे प्रेम तोडण्यासाठी अखलाक खान (नवी मुंबई) यांनी बुवाबाजीचा आधार घेतल्याची माहिती समोर आली. खान यांच्या मुलीचे एका मुलासोबत प्रेम असल्याची माहिती त्यांना मिळाली. ती त्याच्यासोबत लग्न करण्याच्या तयारीत असल्याचेही समजले. त्यामुळे मुलीचे प्रेम तोडण्यासाठी त्यांनी एका बुवाचा आधार घेतला. त्याला मुलीची सर्व माहिती सांगितली. मुलीचे प्रेम तोडायचे असेल, तर जडीबुटी आणि एक वीट २५ विहिरीत टाकावी लागेल, असा अजब सल्ला बाबाने दिला होता. बाबाच्या सल्ल्याने खान साळावपासून ताडगावपर्यंत जडीबुटीची पुडी आणि एक वीट टाकत आले होते.



चार विहिरीत अशा प्रकारे कार्यक्रम केल्यानंतर पाचव्या विहिरीत पुडी टाकत असताना त्यांना ग्रामस्थांनी पाहिले आणि बिंग फुटले. विहिरीत विष टाकल्याचा संशय निर्माण झाल्यामुळे खान यांना सदर विहिरीतील पाणी पिण्यास सांगितले व पोलिसांनी देखील पाणी पिल्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

अनेक नागरिक विविध आजारांवर उपचारासाठी रुग्णालयात जाण्याऐवजी भोंदूबाबाकडे जातात. आजही नागरिकांचा रुग्णालयापेक्षा भोंदूबाबावर अधिक भरवसा असल्याचे दिसून येते. अंधश्रद्धेच्या आहारी जाणाऱ्यांनी आणि बुवाबाजीच्या माध्यमातून त्यांची फसवणूक करणाऱ्यांनी जातीधर्माच्या सीमारेषा कधीच ओलांडलेल्या आहेत याच हे उदाहरण द्योतक आहे. जादूटोणाविरोधी कायदा लागू असला, तरी अंधश्रद्धेचा बाजार आजही कायम असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे. यासाठी जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यात अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे यासंदर्भात बऱ्यापैकी जनजागृती करण्यात येत आहे. परंतु, शासनस्तरावरही जनजागृतीची गरज आहे. जिल्ह्यात जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत आतापर्यंत तीनशेहून अधिक घटना उघडकीस आलेल्या आहेत. मात्र, अंद्धश्रद्धेला खतपाणी घालण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत असतात. अनेकजण यात लुबाडले गेले आहेत. मात्र, त्याबाबत कोणीच पुढे येत नाही, त्यामुळे गुन्हे दाखल होत नाहीत. आधुनिकतेच्या युगात बुवाबाजीला बळी पडू नये तसेच कोणी असे प्रकार करीत असेल, तर त्याची माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना तात्काळ द्यावी, असे आवाहन महा. अंनिसचे राज्य पदाधिकारी नितीनकुमार राऊत यांनी केले आहे.

**सौजन्य कृषिवल**

# संस्मरणीय आठवण

सन १९७८ या वर्षी माझ्या 'सुवर्ण महल' या विज्ञान कथेला मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांचेकडून विज्ञान रंजन कथा स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस डॉ. नारळीकरांच्या हस्ते मिळाले होते. त्यांनी मला हस्तांदोलन केले होते. तेव्हा मी अठ्ठावीस वर्षांचा होतो. त्यावेळेस मला फोटो काढता आला नाही, याचं मला दुःख आहे.

बेंडाळे महाविद्यालय, जळगाव येथे मराठी विज्ञान परिषद जळगाव विभागामार्फत उद्‌घाटन प्रसंगी डॉ. नारळीकर यांना आमंत्रण दिले होते. त्यांच्या हस्ते विज्ञानदीप प्रज्वलित केला होता. विज्ञानदीप पेटविण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर होती. एक कळशी घेतली, त्यावर नारळ ठेवले. नारळाच्या शेंड्यांमध्ये पोटॅशियम पॅरामॅग्नेट आधीच टाकले होते. विज्ञान गीत म्हटले गेले आणि नंतर डॉ. नारळीकरांच्या हातात मोठी पळी दिली. त्या पळीत ग्लिसरीन होते. त्यांनी नारळावर ग्लिसरीन टाकताच अग्नी प्रज्वलित करून विज्ञानदीप पेटला.

जळगाव शहरात डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान एका शैक्षणिक संस्थेने आयोजित केले होते. विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम आयोजित केला होता. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना देखील आमंत्रित केले होते. मला तर खूपच आनंद झाला. त्या कार्यक्रमास मी माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना नेलं होतं. व्याख्यान ऐकण्याची एक पर्वणीच होती. भाषणाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत आणि डॉक्टरांनी उत्तर द्यावे, असा एक संवादी कार्यक्रम झाला. त्यावेळी एका विद्यार्थ्याने एक प्रश्न विचारला होता तो असा...

'आपण श्वास घेतो तेव्हा नाकाद्वारे हवा घेतो. हवेत तर ऑक्सिजनसोबत ७८ टक्के नायट्रोजन वायुचा समावेश असतो, तर आपण हा वायू आपल्या नाकावाटे घेतो का? घेत नसेल तर या वायुचा प्रवेश का होत नाही?' या प्रश्नाचे डॉक्टरांनी फळ्यावर सुबक आकृती काढून अतिशय छान उत्तर दिले होते. नाकाची रचना, रक्ताच्या केशवाहिन्या, फुफ्फुसे आणि त्यांची रचना, नंतर रक्तपेशींचे कार्य, हिमोग्लोबिनचे महत्त्व, या साऱ्या गोष्टी मला जशाच्या तशा आठवतात. शालेय अभ्यासक्रम शिकवताना शिक्षकांनी अद्यावत असलं पाहिजे असं ते आवर्जून म्हणाले. अजूनही एक प्रश्न होता...

'ब्रह्मांड म्हणजे काय? आपलं ब्रह्मांड केवढं आहे?' डॉ. नारळीकरांनी अतिशय छान उदाहरण देऊन मुलांचं समाधान केले. ऐका तर... एक भलं मोठं जहाज आहे. त्या जहाजात अनेक खोल्या आहेत. एका खोलीत अनेक टेबलं आहेत. एका टेबलावर एका कोपऱ्यात एक चेंडू आहे आणि त्या चेंडूभोवती लहानमोठ्या आठ गोट्या आहेत. एक गोटी म्हणजे पृथ्वी आणि त्या गोटीवर एक बारीकसा किडा अस्पष्ट असा दिसत आहे, तो मानव आहे. म्हणजे जहाजात अनेक खोल्या, टेबल हे दुसरं तिसरं काही नसून आकाशगंगा आहेत. ते अनेक सूर्य आहेत. काही अब्ज सूर्य आकाशात आहेत. जहाज समुद्रात आहे. समुद्रात अजूनही सूर्यमाला आहेत. आपण अस्पष्ट किडा, मानव आपल्या सूर्यमालेत, किती नगण्य स्थान आहे. आपली पृथ्वी आणि आपली सूर्यमाला ही या ब्रह्मांडात किती नगण्य आहे.

नंतर माझा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्याशी परिचय झाला. मी शिक्षक असल्यामुळे आणि त्यातल्या त्यात जीवशास्त्र या विषयाचा शिक्षक, विज्ञानाच्या संकल्पना स्पष्ट व्हायला लागल्या होत्या. डॉ. नारळीकरांची सर्व पुस्तके मी वाचून काढलेत. त्या पुस्तकांचा आधार घेऊन मी विज्ञान छंद मंडळ स्थापन केले. माझे विज्ञान गीते, विज्ञान आरती, विज्ञान नाटके, काही वैज्ञानिक गमतीजमती, विज्ञान कोपरा असे विविध प्रकारचे कार्यक्रम खूप गाजलेत. जळगाव आकाशवाणी यांनी माझे कार्यक्रम लावले होते. हे सर्व येतं कुठून? तर हे सर्व वैज्ञानिक दृष्टिकोन समजण्याच्या प्रक्रियेतून येतं. आज मला अभिमान आहे की, मी एका वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणाऱ्या संघटनेत म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन समितीत कृतिशील कार्यकर्ता म्हणून काम करीत आहे.

**दिगंबर कट्यारे**, जळगाव
९८६०३११३२२



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

## नवीन शाखा गठीत

**गोंदिया :** जिल्ह्यातील नवेगाव (बांध) येथे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची नवीन शाखा स्थापन करण्यात आली. अध्यक्ष रवींद्र कुमार दहिवले, उपाध्यक्ष रामदास बोरकर, जनार्धन गजापुरे, कार्याध्यक्ष रामलाल लांजेवार, प्रधानसचिव हरिश्चंद्र लाडे, बुवाबाजी विरोधी संघर्ष विभाग राहुल नरूले, संजीव बडोले, जय गाढवे, शितल राऊत, उत्कल डोये, सुनंदा टेंभुर्णं, विजय डोये, भास्कर बडोले, हेमचंद लाडे यांनी संघटनेचा काम करण्याची स्वतःहून जबाबदारी घेतली. यावेळी संघटनेविषयी सविस्तर मार्गदर्शन करून जादूटोणाविरोधी कायदा आणि चमत्कार त्यामागील विज्ञान समजून सांगण्यात आले. गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव (बांध) येथे संघटनेचे स्थापनेपासून प्रथमच कार्यक्रम घेऊन संघटना गठीत करण्यात आली. कार्याध्यक्ष प्रा. युवराज खोब्रागडे, बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, भंडारा जिल्हा यांच्या नेतृत्वात शाखा गठीत करण्यात आली.

## सामाजिक समता सप्ताह

**नवेगाव/मुरखळा (गडचिरोली):** ग्रामपंचायत व महा.अंनिस शाखा नवेगाव मुरखळा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी सरपंच तथा महा.अंनिस अध्यक्ष दशरथ चांदेकर, उमाजी खेवले, ग्रा.प.सदस्य तथा कार्याध्यक्ष महा.अंनिस, रवी नागापुरे, प्रधानसचिव महा.अंनिस, मिलिंद खोब्रागडे, एम.एम. मोगरकर, ग्रामविकास अधिकारी, व्ही.ए.काकडे, चंदु कावळे, राकेश मांदाळे, स्वराज मांदाळे उपस्थित होते.

गडचिरोली शाखेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विलास निंबोरकर, राज्य सहकार्यवाह विठ्ठलराव कोठारे, जिल्हा कोषाध्यक्ष गोविंदराव ब्राह्मणवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख पुरुषोत्तम ठाकरे, शाखेचे अध्यक्ष लहुजी रामटेके, कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर, प्रधानसचिव हरिदास कोटरंगे, सोनल निंबोरकर, महानंदा निंबोरकर आदी उपस्थित होते.

घोट शाखेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य चोपाराम कांबळे, शाखा अध्यक्ष दिनकर लाकडे, उपाध्यक्ष हेमंत उपाध्ये, कार्याध्यक्ष आसिफ सय्यद, प्रधानसचिव रविभाऊ सोमनकर, हेमंतराव दुधबावरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कुरखेडा तालुक्यातील सोनेरांगी येथे मोहनभाऊ गणपत मोहुर्ले यांनी देखील घराजवळील सहकाऱ्यांच्या मदतीने कार्यक्रमाचे आयोजन केले.

**शहापूर :** भीमजयंती पूर्वसंध्याकाळी भिवंडी येथील लोणाड गावी महा.अंनिस शहापूर शाखे तर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिलांसाठी योगदान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास साधना भेरे तसेच प्रमोद जाधव उपस्थित होते.

**वर्धा :** बजाज सार्वजनिक वाचनालय येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनाच्या पूर्वसंध्येवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत कोणकोणते योगदान कोणकोणत्या क्षेत्रात राहिले यांची माहिती देणारे पोष्टर प्रदर्शन लावण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन वर्धा जिल्ह्याचे खासदार अमरभाऊ काळे यांनी केले. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार, कायदा विभागाचे जिल्हा कार्यवाह ॲड. नंदकुमार वानखेडे, कार्यकर्ता संघर्ष डहाके, संयुक्त कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष मा. गुणवंत डकरे यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन

**कोराडी :** शाखेतर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना महामानवांच्या व्यसनमुक्तीपर विचार पोष्टर प्रदर्शनाने अभिवादन करण्यात आले. यावेळी कोराडी शाखेचे अध्यक्ष ताराचंद पाखिडे यांनी उपस्थितांना

व्यसनमुक्तीची शपथ दिली. महाराष्ट्र अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीकरिता महामानवांचे वैचारिक योगदान यावर मार्गदर्शन केले. यावेळी तुकडोजी महाराजांच्या पुतळ्याच्या आवारामध्ये महामानवांच्या व्यसनमुक्तीपर विचारांच्या पोष्टरची प्रदर्शनी लावण्यात आली. उपस्थितांना पुस्तिकेचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला सेवानंद विद्यालयाचे राऊत गुरुजी, बाबा भालेराव, बाळकृष्ण झाडोकार, मयूर मानवटकर, राम तोडवाल, प्रीतम लोहसारवा, मनीषा केने, सुरेखा पाटील, किरण कटरे, गोलू वानखेडे, नंदा तूरक, ब्रह्मा काळे, नीलिमा केणे, प्रल्हाद वैश्य, गोपाळ गोडबोले इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन शाखा प्रधानसचिव विलास भालेराव यांनी केले.

### तुकडोजी महाराजांना अभिवादन

**गडचिरोली :** शाखेतर्फे आरमोरी रोड येथील महा.अंनिस कार्यालयात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महा.अंनिस तर्फे वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्यासोबतच सर्व संत व समाजसुधारकांच्या विचाराचा प्रचार व प्रसार करण्यात येईल, असे ठरविण्यात आले. यावेळी वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर, जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, जिल्हा प्रधानसचिव विलास पारखी, शाखेचे उपाध्यक्ष शब्बीर शेख, वामनराव भोयर, कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर, प्रधानसचिव हरिदास कोटरंगे, अविनाश मेश्राम, मालाताई रोहनकर, महानंदा निंबोरकर आदी उपस्थित होते.

### उन्हाळी साहस शिबिर

**पनवेल :** २६ ते २८ एप्रिल दरम्यान महा.अंनिस पनवेल शाखेतर्फे साहस शिबिर २०२५ चे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये रॅपलिंग, व्हॅली क्रॉसिंग, आकाशदर्शन, चमत्कारामागील विज्ञान, आपत्कालीन व्यवस्थापन, ओरोगामी, शरीर विज्ञान, विविध कलागुणदर्शन आणि मनोरंजक खेळातून व्यक्तिमत्त्व विकास या वैविध्यपूर्ण सत्रांचे आयोजन केले गेले.

### कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील शिरोळ, हातकणंगले, हुपरी शिरोली या भागातील कार्यकर्त्यांसाठी आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर उत्साही वातावरणामध्ये पार पडले. या शिबिरासाठी ३० पेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिरात कृष्णात स्वाती, जगतकर सर, हर्षल, निशांत सोबतीला प्रमोद, अमृता, राहुल या सर्वांच्या संवादाने, सहभागाने हे प्रशिक्षण आनंददायी वातावरणामध्ये पार पडले. शेवटी सुनील स्वामी यांनी या प्रशिक्षण उद्देश व हेतू सगळ्यांसमोर मांडला. उर्वरित शाखेसाठीसुद्धा येत्या काळामध्ये ही प्रशिक्षण शिबिर होणार आहेत.

### कोल्हापूर येथे 'ऐसे कैसे झाले भोंदू' विनोदी बतावणीचे सादरीकरण

**कोल्हापूर :** सेंटर फॉर रेनेसां, हेर्ले आयोजित समर कॅम्पमध्ये समितीने 'ऐसे कैसे झाले भोंदू' ही विनोदी बतावणी सादर केली. नाटिकेत हवेतून चेन काढणे, जळता कापूर खाणे, जिभेतून सळी आरपार करणे, डोळे बांधून वस्तू ओळखणे असे चमत्कार दाखवून त्यामागचे विज्ञान आणि हातचलाखी मुलांना समजावून सांगितली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती मुलांना देऊन चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन करून कार्यक्रमाची सांगता झाली. कपिल मुळे, संघसेन जगतकर, स्वाती कृष्णात, महेश ओलेकर, प्रमोद शिंदे आणि महेंद्र यांनी सहभाग घेतला.

### 'बौद्ध धम्म आणि वैज्ञानिक दृष्टिकोन'

**कल्याण :** बुद्ध वंदना संघ, आरटीओ आणि महा.अंनिस कल्याण शाखा यांच्या सहकार्याने बुद्धपौर्णिमा निमित्ताने प्रबोधन कार्यक्रम आयोजित केला. संवादक डॉ.सुषमा बसवंत, (कार्याध्यक्ष, ठाणे जिल्हा, महा.अंनिस) यांनी बौद्ध धम्म आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर जनप्रबोधन केले.

### 'गौतम बुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' मनोरंजनातून प्रबोधन

**पालघर :** महा.अंनिस पालघर जिल्ह्यातर्फे केळवे माहीम, आंबेडकर आळी येथे बुद्धपौर्णिमेनिमित्त 'गौतम बुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' हा मनोरंजनातून प्रबोधन कार्यक्रम चमत्काराच्या प्रयोगासहित सादर करण्यात

आला. प्रथम वाणगाव शाखेचे कार्याध्यक्ष मिनेश जाधव यांनी सुरुवात करताना टाळ्यांच्या माध्यमातून एक्सरसाइज घेत लोकांना फ्रेश केले. यानंतर राज्य कार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी 'गौतम बुद्ध, बाबासाहेब आंबेडकर आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर सुमारे दोन तास मांडणी केली. कार्यकर्त्यांनी चमत्काराचे प्रयोग आणि चळवळीची गाणी सादर केली. शेवटी नवीन कार्यकर्ते अशोक शेरेकर यांनी शासनातर्फे पालघर येथे मानसोपचार कसे होऊ शकतात, याची माहिती दिली. अशाप्रकारे महाअंनिस पालघर तर्फे वैचारिक बौद्ध पौर्णिमा साजरी झाली.

### सत्यशोधकी विवाह

**वर्धा :** समितीच्या जिल्हा व शहर शाखा वर्धा यांच्या पुढाकाराने ७१ वा सत्यशोधकी विवाह लावून देण्यात आला. अविवाहित असलेल्या योगेश राऊत याने पती निधनानंतर दोन मुलासोबत राहात असलेल्या प्रिया बाळबुधे हिचा स्वीकार केला.

### कायद्याच्या चित्रमय पुस्तिकांचे मोफत वाटप

**निमगुळ :** धुळे जिल्हातील निमगुळ (ता.शिंदखेडा) शाखेच्या वतीने २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून जादूटोणाविरोधी कायदा, सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा चित्रमय पुस्तिका निमगुळ येथील महिला व पुरुषांना माहिती देऊन वाटप केले.

यावेळी म.अंनिसचे जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी जादूटोणाविरोधी कायदाची १२ कलमाची सविस्तर माहिती दिली, भूतभानामती, करणी, अतिइंद्रिय शक्ती, अलौकिक शक्तीच्या अभासातून पुत्रप्राप्तीचे अमिष, अवतारी व्यक्ती, पवित्र आत्मा, पुनर्जन्म याबद्दल मनातील भीती दूर करून जनजागृती केली. तसेच त्यांनी सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्याबद्दल माहिती दिली. लक्ष्मीबाई ठाकरे, मिराबाई ठाकरे, सरूबाई कुंभार, सविताबाई राजपूत, सुमनबाई ठाकरे, निर्मलाबाई पगारे, दिपालीबाई पाटील, लिलाबाई पाटील, सुंदरबाई मराठे, पंडित कुंभार, शांताराम ठाकरे आदी उपस्थित होते.

•

### • वाचक प्रतिक्रिया •

मे २०२५ ची अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका वाचण्यात आली. यामध्ये सर्वच लेख वाचनीय व विचार करण्यास प्रेरणा देणारे आहेत. अंगात दैव शक्ती आल्याचा दावा अंगाशी आला हा लेख वाचल्यानंतर शिवकालीन घटना आठवली. ऐतिहासिक काळी जागरण गोंधळ ही लोककला शिवाजी महाराजांनी राज्यकारभार करण्यासाठी वापरून विरोधकांचे मनसुबे समजून घेऊन त्यांच्यावर हल्ले केले आणि हिंदवी स्वराज्य स्थापन केले. राजांनी कधीही मुहूर्त बघितला नाही, लिंबू कापले नाही, अंडे फोडले नाही, इ. मात्र वर्तमान काळामध्ये या लोककलेचा काही लोक देव अंगात आणून त्या कुटुंबाला वेगवेगळ्या प्रकारच्या पूजा करण्यासाठी वेठीस धरतात. देव अंगात आणण्याकरिता विशेष चार्ज (फी) त्यांच्याकडून घेतले जातात. हा अंधश्रद्धेचा सगळा बाजार श्रद्धेच्या दारातून आजही सर्रास महाराष्ट्रामध्ये सुरू आहे. तसेच या अंकातील कार्टून विभाग यात माझा वर्गमित्र अरविंद गाडेकर यांनी सध्याच्या राजकीय विश्लेषण बाबत आपले अपयश लपविण्याकरिता अनेक प्रकारच्या अंधश्रद्धेचा वापर करून लोकांच्या मनामध्ये अंधश्रद्धा पसरवण्याचे काम राजकीय लोक करत आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जो पराभव झाला. त्यांनी अंधश्रद्धेचा फार खुबीने वापर करून समाज मनावर आपला पगडा अपयशानंतर सुद्धा कायम ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवलेला आहे .परंतु आपण ज्या कारणांमुळे अपयशी ठरलो त्याचा ते विचार करत नाही. आणि यातूनच अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यासाठी श्रद्धेच्या अडून वेगवेगळ्या ठिकाणच्या कार्यक्रमांना उपस्थित राहून अंधश्रद्धा लोकांच्या मनामध्ये निर्माण करून आपली पोळी पुढील निवडणुकीमध्ये कशी भाजून घेता येईल. याचा आज सर्रास अपयशी झालेले उमेदवार आपल्या मतदार संघात दिवसाढवळ्या हे काम करत असलेले दिसून येतात. अत्यंत मार्मिक पणाने या कार्टून मध्ये हा संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झालेला आहे. अशाच पद्धतीचे दर्जेदार कार्टून याही पुढील अंकामध्ये वाचण्यास मिळतील अशी अपेक्षा करतो. शुभेच्छा!

**अर्जुन कासार**, नाशिक
९७६३९६४९६६

# पीडित कुटुंबाची भेट घेवून अंनिसने घालवली गडमुडशिंगी ग्रामस्थांची भीती

**करवीर (जि. कोल्हापूर) :** गडमुडशिंगी गावातील माळी कुटुंबीयांच्या घराजवळ शुक्रवार, २ मे आणि रविवार, ४ मे रोजी अंधश्रद्धेतून काही विधी करण्याचा प्रकार घडला होता. यामुळे हे कुटुंब दहशतीखाली होते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना ही बातमी कळल्यानंतर त्यांनी संबंधित कुटुंबीयांना संपर्क करून तात्काळ त्या कुटुंबीयांची भेट घेतली. कार्यकर्ते कुटुंबात भेटीसाठी गेले तेव्हा संपूर्ण कुटुंबीय आणि त्यांचे शेजारी खूप घाबरलेले लक्षात आले. ज्या पद्धतीने पाठोपाठ दोन दिवस करणीसारखा प्रकार वाटावा अशा गोष्टी घराच्या चौकटीला लागून होतात हे पाहून या कुटुंबातील सर्वच जण विशेषतः महिला प्रचंड दहशतीखाली असल्याचे कार्यकर्त्यांना जाणवले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण कुटुंबीयांशी चर्चा करून अंधश्रद्धा निर्मूलन समितीने याआधी हाताळलेल्या प्रकरणांची माहिती दिली. तसेच संघटनेने हाताळलेल्या अशा काही घटनांचे व्हिडिओ दाखवून करणी, भानामती वगैरे प्रकारातून काही वाईट किंवा अनिष्ट गोष्टी घडवता येऊ शकत नाही, याचा विश्वास दिला आणि त्यांची भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबरच या प्रकाराच्या अंधश्रद्धेमुळे आणि त्यातून तयार झालेल्या भीतीमुळे काहीजण तुम्हाला अंधश्रद्धेचे वेगवेगळे उपाय सुचवतील आणि त्यातून आर्थिक फसवणूकसुद्धा केली जाऊ शकेल, अशा प्रकारांना बळी पडू नये असे आवाहन केले. ज्या ठिकाणी हा प्रकार घडला होता त्या ठिकाणी बसून संबंधित कुटुंबीयांसोबत चहापान करून त्यांच्या मनातील भीती कार्यकर्त्यांनी दूर केली. अंनिस कार्यकर्त्यांच्या या भेटीनंतर कुटुंबीयांच्या मनावरचा तणाव बराच कमी झालेला लक्षात आला. यावेळी महाराष्ट्र अंनिस राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, जिल्हा कार्याध्यक्ष हरी आवळे, जिल्हा प्रधानसचिव प्रमोद शिंदे, करवीर शाखा कार्याध्यक्ष संघसेन जगतकर हे उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी संबंधित गावचे सरपंच आणि पोलीस पाटील यांच्याशी संपर्क करून गावात अशा प्रकारच्या अंधश्रद्धा कृतीतून दहशत माजवणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे फलक सार्वजनिक ठिकाणी लावण्याचे व गावात अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन देखील केले. दुसऱ्या दिवशी संबंधित कुटुंबीयांसोबत गांधीनगर पोलीस ठाणे येथे जाऊन असा अंधश्रद्धा प्रकार करणाऱ्या अज्ञाताविरुद्ध तक्रार दाखल केली. यावेळी पोलीस निरीक्षक तनपुरे यांनी संबंधित प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचा विश्वास माळी कुटुंबीय आणि अंनिस कार्यकर्त्यांना दिला आहे. यावेळी अंनिसचे प्रमोद शिंदे, संघसेन जगतकर, रामदास देसाई, रेश्मा खाडे, निशांत सुनंदा विश्वास हे कार्यकर्ते उपस्थित होते. या कुटुंबीयांच्या मनातील भीती दूर व्हावी यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या रेश्मा खाडे यांनी माळी कुटुंबीयांसोबत त्यांच्या घरात राहाण्याचा निर्णय घेऊन त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद केला. त्यांच्यातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. माळी कुटुंबीय आणि परिसरातील नागरिकांच्या मनात दहशत माजवणाऱ्या या प्रकरणात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दाखवलेल्या तत्पर कृतिशीलतेचे परिसरातून कौतुक होत आहे.



## महा.अंनिसचे विविध उपक्रम



सामाजिक समता सप्ताह, नवेगाव मुरखळा (गडचिरोली)



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर मार्गदर्शन करताना सुशीला मुंडे (भंडारा)



जिल्हा प्रेरणा मेळावा (अहिल्यानगर)



जिल्हा बैठक (सातारा) किशोर बेडकीहाळ, संजय बनसोडे, डॉ. नितीन शिंदे, डॉ. सुषमा बसवंत व साथी



जिल्हा प्रेरणा मेळावा (नांदेड)



नुतन शाखा गठीत (बुलढाणा) विनायक सावळे, किर्तीवर्धन तायडे, प्रदीप राऊत व साथी



खगोल यात्रा (२००९) डॉ. नारळीकर, डॉ. दाभोलकर, डॉ. नितीन शिंदे, संजय बनसोडे व साथी



नाशिक येथे डॉ. नारळीकरांसोबत सुधीर धुमाळ, कृष्णा चांदगुडे, महेंद्र दातरंगे व डॉ. टी. आर. गोराणे

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष चौथे अंक सहावा, ५ जून २०२५ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 4 Issue 6, 5th June 2025 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

## वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क - व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळींवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ____________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.